अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १६० । मंगळवार २४ मार्च २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## अंधविश्वासाने परमात्मा मिळणं अशक्य!

**'सहजयोग'**
**भाग ६**



**काहे रे बन खोजन जाई ।**
**सदा निवासी सदा अलेपा,**
**तोहे संग समाये ।।**
**पुष्प मध्य जो बांस बसत है ,**
**मुकुरा मांहि जस छाई ।**
**तैसे हि हरि बसे निरंतर ,**
**घट ही खोजो भाई ।।**

जो मनुष्य या अतिशयतेच्यापासनं बाहेर निघालेला आहे, त्याच्यासाठी माझा सहजयोग फारच सहज आहे. आपल्याला जाणवणार नाही तोपर्यंत ते आपलं एक सत्य/पक्के होणार नाही, जोपर्यंत आपण त्याला शक्तीचा काही तरी अनुभव मिळला नाही. आंधळ्यासारखा माझ्या गोष्टीवर कोणीही विश्वास कृपा करून करू नये. अंधविश्वासाने परमात्मा मिळणं अशक्य आहे. ही जी परमात्म्याची शक्ती आहे तिने सर्व सृष्टीची जर रचना केली आहे, तर या लहान-लहानशा गोष्टी करण्यामध्ये काय वैशिष्ट्ये आहे! सगळे रोग जाऊ शकतात. पण पहिल्यांदा आपल्या आतली शक्ती प्रत्येकाने मिळवली पाहिजे. आणि संपूर्ण स्वतंत्रेतेत मिळाली पाहिजे.

( परमपूज्य माताजी श्री निर्मलादेवी यांचा धुळे येथील कार्यक्रमातील उपदेश, ९ एप्रिल १९७२ )

# १४.२ किलोच्या सिलेंडरमध्ये ८ ते १० गॅस!

## गॅस तुटवड्यावर सरकारचा तोडगा : जितका गॅस तितकीच रक्कम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** घरगुती गॅस सिलिंडरच्या वितरणात महत्वाचा बदल करण्याचे सरकारने ठरवले आहे. घरगुती वापराचा गॅस सिलिंडर नागरिकांना आता अर्ध्याच वजनाचा मिळणार आहे. घरगुती वापराचा गॅस सिलिंडर १४.२ किलोच्या प्रमाणात नागरिकांना देण्यात येतो. मात्र, आता हा घरगुती वापराचा गॅस ८ ते १० किलोच्या प्रमाणात नागरिकांना देण्यात येणार आहे. सिलेंडर तोच राहणार आहे. मात्र, त्यामध्ये गॅस आठ ते दहा किलोच्या प्रमाणात भरण्याचे आदेश गॅस कंपन्यांना देण्यात आलेत. जेवढा गॅस असेल तेवढे पैसे आकारले जाणार आहेत.

युद्धामुळे गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या भरुन तयार असलेले १४.२ किलोचे सिलेंडर संपल्यानंतर नवीन सिलेंडर आठ ते दहा किलोच्या प्रमाणात भरण्यात येणार आहेत. यापुढे गॅस सिलेंडर कमी वजनाचे असल्याने ते साहजिकच कमी दिवस पुरणार आहेत. त्यामुळे सामान्य घरातील दैनंदिन गणित बिघडणार आहे. यावर सामान्य नागरिक कशाप्रकारे व्यक्त होणार, हे बघावे लागेल. याशिवाय, कमी वजनाच्या या घरगुती गॅस सिलेंडरची किंमत किती असणार, याकडेही



### २७ देशांऐवजी ४१ देशांकडून आयात

**सरकार देशात तेल आणि वायूचे संकट टाळण्याचा प्रयत्न करत आहे. यासाठी, आम्ही आता २७ देशांऐवजी ४१ देशांकडून आयात करत आहोत. पश्चिम आशियामध्ये एक कोटी भारतीय राहतात. त्यांची सुरक्षा हे आमचे प्राधान्य आहे. ३ लाख ७५ हजार भारतीय सुखरूप देशात परतले आहेत. एक हजार भारतीय एकट्या इराणमधून सुखरूप परतले आहेत. त्यापैकी ७०० हून अधिक तरुण वैद्यकीय विद्यार्थी आहेत.**

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



सगळ्यांच्या नजरा आहेत. इराण विरुद्ध अमेरिका-इस्रायल हे युद्ध दिवसेंदिवस चिघळताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये इस्रायलने इराणमधील गॅस फिल्ड आणि खनिज तेलाचे साठे असलेल्या परिसरांमध्ये हवाई हल्ले केले आहेत. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने कतारमधील सर्वात मोठा नैसर्गिक वायूचा साठा असलेल्या परिसराला लक्ष्य केले आहे. यामुळे युद्ध संपल्यानंतरही या सुविधा पूर्ववत होण्यासाठी बराच वेळ जावा लागेल. त्यामुळे पुढील काही महिने जगभरात गॅसची टंचाई असेल, असा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर आता केंद्र सरकारने आवश्यक ती पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

गेल्या काही दिवसांमध्ये एलपीजी गॅसच्या तुटवड्याच्या भीतीने नागरिकांनी अनेक ठिकाणी गॅस एजन्सीबाहेर रांगा लावल्याचे दिसून आले होते. सरकारने वारंवार आवाहन करुनही नागरिकांना घरगुती सिलेंडर मिळणार की नाही, याबाबत धास्ती कायम आहे.

दरम्यान, गॅसच्या तुटवड्यामुळे सरकारने व्यावसायिक वापराच्या एलपीजीसाठी गॅस पुरवठा बंद केला होता. त्यामुले हॉटेल इंडस्ट्रीवर गंडांतर ओढवले होते. मात्र, आता मध्यपूर्वेतील (इराण-इस्रायल) युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेली गॅस टंचाई दूर करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने व्यावसायिक एलपीजी पुरवठ्यात २० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यातील हॉटेल्स, ढाबे आणि अन्न प्रक्रिया उद्योगांना मोठा दिलासा मिळणार असून, वाढीव पुरवठा तत्काळ लागू करण्यात आला आहे. आखाती देशातील युद्धाचा परिणाम भारतातील व्यवसायावर झाले आहेत, नांदेडमधील मिनरल पाणी बॉटल तयार करणाऱ्या व्यवसायावर याचे परिणाम दिसून येत आहेत. बॉटल साठी लागणारे रॉ मटेरीयलची आयात बंद आहे.प्रीफॉर्म, कॅप, लेबल, रॅपर रोल यांचे ६० टक्क्याने दर वाढले आहेत. त्यामुळे बॉटलीच्या दरात वाढ झाली आहे. मात्र याचा फटका सामान्य नागरिकांना बसणार नाही तर रिटेलर आणि डीलर यांना बसणार आहे. पूर्वी ८५-९० रुपयांना मिळणारे पाण्याचे बॉक्स आज १००-१२० रुपयांना विक्री होतं आहेत. दरम्यान अशीच युद्धाची परिस्थिती राहिली तर व्यवसाय बंद होण्याची भीती मिनरल बॉटल व्यावसायिक शैलेश कऱ्हाळे यांनी व्यक्त केली आहे.

# इराणच्या वीज प्रकल्पांवर हल्ला होणार नाही

## ट्रम्प यांची घोषणा

## कच्चा तेलाच्या भावात घसरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे जगभरात कच्च्या तेलाच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे. आशियामध्ये भारतीय चलनावर याचा विशेष परिणाम होत असून, डॉलरच्या तुलनेत ते ९४.०१ पर्यंत घसरले आहे. दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या घोषणेनंतर कच्च्या तेलाच्या किमतीत लक्षणीय घसरण नोंदवली गेली आहे. इराणसोबत वाटाघाटी सुरू आहेत. इराणच्या वीज प्रकल्पांवर कोणताही हल्ला होणार नाही असे ट्रम्प यांनी म्हटलं आहे. गेल्या दोन दिवसांपासून वाटाघाटी सुरू असून पुढील काही दिवस त्या सुरू राहतील असे ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

व्यापारादरम्यान ब्रेंट क्रूड १५ टक्क्यांनी घसरून प्रति बॅरल ३६ डॉलरवर आले. ११ मार्चनंतर प्रथमच त्याची किंमत १०० डॉलरच्या खाली घसरली होती. वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट देखील १३.५ टक्क्यांनी घसरून प्रति बॅरल ८५.२५ डॉलरवर आले.


डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेल्या माहितीनुसार, इराणसोबत चर्चा सुरू आहे आणि सध्या इराणच्या वीज प्रकल्पांवर कोणताही हल्ला होणार नाही. गेल्या दोन दिवसांपासून चर्चा सुरू असून पुढील काही दिवस ती सुरूच राहील. परिणामी, पुढील पाच दिवस तेहरानच्या वीज प्रकल्पांना लक्ष्य केले जाणार नाही. ट्रम्प यांच्या घोषणेनंतर कच्च्या तेलाच्या किमती सुमारे १० टक्क्यांनी घसरल्या, ज्यामुळे जागतिक बाजारांना काहीसा दिलासा मिळाला.

दरम्यान, अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष आता चार आठवड्यांपासून सुरू आहे आणि शांततेची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. दरम्यान, इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्यामुळे तेल आणि वायू पुरवठ्यावर परिणाम झाला असून, जागतिक ऊर्जा संकट अधिक गंभीर झाले आहे. याचा परिणाम भारतासह अनेक देशांमध्ये स्पष्टपणे दिसून येत आहे.



**वाटाघाटी करण्यास इराणचा नकार**
**अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या दाव्यांच्या विरुद्ध, इराणने अमेरिकेसोबत कोणतीही शांतता चर्चा झालेली नाही असे सांगून प्रत्युत्तर दिले आहे. तेहरानने ट्रम्प यांचा दावा पूर्णपणे फेटाळून लावला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या वीज प्रकल्पावर हल्ला न करण्याचा निर्णय इराणकडून मिळालेल्या इशाऱ्यानंतर घेतला. या अहवालात असेही म्हटले आहे की, मध्यस्थांमार्फतही इराणशी कोणताही संपर्क झालेला नाही.**

## महत्त्वाचे..



### वसंत मोरेंवर अटकेची टांगती तलवार

मुंबई : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) गटाचे नेते वसंत मोरे यांच्यावर ॲट्रॉसिटी अंतर्गत दाखल गुन्ह्यात न्यायालयाने अटकपूर्व जामीन फेटाळल्याने मोरे यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता वाढली आहे. काही दिवसांपूर्वी वसंत मोरे यांनी एका जाहीर पत्रकार परिषदेत वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष अविनाश विश्वनाथ लहाडे यांचे वडील विश्वनाथ तुकाराम लहाडे यांच्याबद्दल वादग्रस्त आणि अपमानास्पद वक्तव्य केले होते. या वक्तव्यामुळे दलित समाजाच्या भावना दुखावल्या गेल्याचा आरोप करत लहाडे कुटुंबियांच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात वसंत मोरे यांच्याविरोधात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (ॲट्रॉसिटी) गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून वसंत मोरे यांनी अटकेपासून संरक्षण मिळवण्यासाठी जिल्हा न्यायालयात धाव घेत अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. मात्र, दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आणि प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायालयाने मोरे यांचा जामीन अर्ज फेटाळून लावला. न्यायालयाच्या या निर्णयामुळे पोलिसांना आता मोरेंना ताब्यात घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# सुसाईड नोटमध्ये माजी आ. भानुदास मुरकुटेंसह सुनबाईंचे नाव!

## पाथरे येथील नवरा बायकोचा वाद : मुरकुटेंसह १० जणांनी मारहाण केल्याचा दावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील पाथरे येथील ४३ वर्षीय अच्युत गोपीनाथ साळे यांनी २३ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास राहुरी पोलिस ठाण्याच्या आवारात विषारी औषध घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यांच्या खिशात सापडलेल्या सुसाइड नोटमध्ये माजी आमदार भानुदास मुरकुटे व त्यांच्या सुनबाई डॉ. वंदना मुरकुटे यांनी मारहाण करून औषध घेण्यास प्रवृत्त केल्याचा गंभीर आरोप केला आहे. या घटनेने अहिल्यानगर जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडाली असून, राजकीय वर्तुळात चर्चेचे वारे सुरू झाले आहे.

अच्युत साळे यांना तातडीने राहुरी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने त्यांना श्रीरामपूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले. त्यांच्या बंधू संजय साळे यांना खिशात सुसाइड नोट सापडली. नोटमध्ये लिहिले आहे की, अच्युत व त्यांची पत्नी जनाबाई किरण चव्हाण यांनी एकत्र ५ एकर २० आर जमीन घेतली होती, परंतु ती जनाबाईच्या नावावर केली. आता जनाबाईने त्यांना घराबाहेर काढले. काशिनाथ जाधव (तंटामुक्ती अध्यक्ष), ऋषी पोपट बाचकर, सुभाष



**या सुसाइड नोटमध्ये भानुदास मुरकुटे व वंदना मुरकुटे यांच्यासह १० जणांची नावे घेण्यात आली आहेत. अद्याप पोलिस ठाण्यात कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. मात्र, या आरोपांमुळे तालुका व जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले आहे. कोणावर नेमका कोणता गुन्हा दाखल होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

कल्याण जाधव, बाळू पोपट बाचकर, प्रथमेश सुभाष जाधव, कल्याण रामदास जाधव, दत्तू वनकर जाधव, गिताराम गारकर यांनी दोन महिन्यांपासून मारहाण व रात्री दगडफेक केल्याची नोंद पोलिस ठाण्यात दिली असूनही, भानुदास मुरकुटे व वंदना मुरकुटे यांनी मारहाण केली व औषध घेण्यास प्रवृत्त केले. जनाबाईने जमीन बाचकर यांना २० लाख रुपयांना विकली असून, बाचकरांनी अच्युतला घराबाहेर काढण्यास सांगितले व संपूर्ण जमीन गुपचूप विकत घेण्याचे आश्वासन दिले, असे नोटमध्ये नमूद आहे.

भानुदास मुरकुटे हे श्रीरामपूरचे माजी आमदार असून, अशोक उद्योग समूहाचे प्रमुख आहेत. ते स्थानिक राजकारणात प्रभावशाली मानले जातात. त्यांच्या सुनबाई डॉ. वंदना मुरकुटे या प्राइड अकॅडमीच्या संस्थापक संचालिका असून, श्रीरामपूर पंचायत समितीच्या माजी सभापती राहिल्या आहेत. त्या महिला काँग्रेसच्या महासचिव म्हणूनही ओळखल्या जातात. अशा प्रतिष्ठित राजकीय व सामाजिक पार्श्वभूमीच्या व्यक्तींवर असे गंभीर आरोप येणे हे अहिल्यानगर जिल्ह्यातील राजकीय चर्चेचा विषय ठरले आहे. या घटनेची चौकशी होऊन सत्य समोर येईल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक स्तरावरून होत आहे. या घटनेत जमीन वाद, कौटुंबिक मतभेद व राजकीय दबाव यांचा संबंध असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## 'जननेंद्रियाचा त्याग मी स्वत:हून केला'

### तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांचा धक्कादायक खुलासा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** मला सात दिवसांनंतर डिस्चार्ज मिळाला असून सध्या मी सुखरूप आहे. मी गेलो होतो, पण यमाच्या जबड्यातून डॉक्टरांनी खेचून आणलं आहे. डॉक्टरांबद्दल काय बोलावे, त्यांच्यासाठी शब्द नाहीत माझ्याकडे... असे डॉक्टर पुन्हा होणे नाही. डॉ. तन्वर हे अहिल्यानगरचे भूषण आहे. जो काही जननेंद्रियाचा त्याग झाला, तो मी स्वत:हून करून घेतला. कोणाचाही काहीच त्रास नाही, कोणीही माझी काळजी करू नका, मी आनंदात आहे. सर्वांनी सुखी राहा... असा खुलासा श्री क्षेत्र तारकेश्वर गडाचे महंत ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री यांनी केला.

श्री क्षेत्र तारकेश्वर गडाचे महंत ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री यांनी स्वत:च्या जननेंद्रियावर शस्त्राने वार करून गंभीर जखमी झाल्याच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली होती. १५ मार्च रोजी गडावरील आपल्या खोलीत रक्तबंबाळ अवस्थेत आढळलेल्या महाराजांना तातडीने अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया झाली आणि सात दिवसांनंतर आज (२३ मार्च) त्यांना डिस्चार्ज देण्यात आला.डिस्चार्जनंतर प्रथमच माध्यमांसमोर आलेल्या आदिनाथ महाराज शास्त्री यांनी या संपूर्ण प्रकरणाचा थेट खुलासा केला. सुरुवातीला आत्महत्येचा प्रयत्न, दबाव किंवा अन्य कारण असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या, परंतु महाराजांनी कोणावरही आरोप न करता हे कृत्य स्वेच्छेने आणि स्वत:हून केल्याचे स्पष्ट केले. त्यांनी कोणत्याही बाह्य दबावाचा उल्लेख केला नाही.डॉक्टरांचे आवाहन आणि गडावरील स्थिती शस्त्रक्रियेनंतर महाराजांची प्रकृती स्थिर झाली असली तरी संसर्गाचा धोका कायम **(पान ४ वर..)**

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'राजमाता जिजाऊ' एसटी बससेवेचे आज लोकार्पण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत राज्याच्या सार्वजनिक परिवहन व्यवस्थेत म्हणजेच एसटीच्या ताफ्यात नव्या पर्वाची सुरुवात होत आहे. 'राजमाता जिजाऊ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अत्याधुनिक एसटी बससेवेचे लोकार्पण सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आज, दि. २४ मार्च रोजी विधिमंडळाच्या प्रांगणात संपन्न होणार आहे.

**तीन हजार अत्याधुनिक स्मार्ट बसेसची भर**

या सोहळ्यास विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आणि विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते म्हणाले, या बसेसना 'राजमाता जिजाऊ' हे नाव देण्यामागे हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणास्थान असलेल्या जिजाऊसाहेबांना अभिवादन करण्याची भावना आहे. स्वराज्याचे शिल्पकार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मागील संस्कारशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ होय. या मातृशक्तीचा गौरव या नावातून अधोरेखित करण्यात आला आहे. एसटी महामंडळाने यापूर्वी 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'यशवंती' आणि 'हिरकणी' अशा ऐतिहासिक नावांनी बससेवेला वेगळी ओळख दिली आहे. त्या गैरवशाली परंपरेत आता 'राजमाता जिजाऊ' या नावाची भर पडल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा सन्मान अधिक समृद्ध झाला आहे, असेही मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

# पाणीपुरवठा निविदा प्रकरणात विरोधकांचा हल्लाबोल

## श्रीरामपूर नगरपालिकेची सर्वसाधारण सभा गाजली; ग्रंथपाल पुरे निलंबित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर नगरपालिकेच्या काल झालेल्या सर्वसाधारण सभेत पाणीपुरवठा विभागाच्या वार्षिक निविदा प्रकरणाने जोरदार वादळ निर्माण केले. स्थानिक वर्तमानपत्राऐवजी मुंबईच्या वृत्तपत्रात जाहिरात देणे, निविदा प्रक्रियेत कर्मचाऱ्यांची हलगर्जीपणा आदी मुद्द्यांवर विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी तीव्र टीका केली. याशिवाय ग्रंथपाल स्वाती पुरे यांचे निलंबन, रामनवमी यात्रेतील पाळणा दर, अनधिकृत नळ कनेक्शन, घरकुल योजना आदी विषयांवरही चर्चा रंगली. नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या या सभेत वैशाली चव्हाण यांनी आक्रमक भूमिका घेत सभागृह गाजवले.

पाणीपुरवठा विभागाच्या वार्षिक निविदेसाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात न देता मुंबईच्या पेपरमध्ये जाहिरात दिल्याबद्दल तसेच निविदा स्वीकारण्यासाठी अभियंता मराठे व पाणीपुरवठा विभागाचे निलेश बकाल यांच्या हलगर्जीपणाबद्दल विरोधकांनी प्रश्नांचा भडीमार केला. दोन्ही अधिकाऱ्यांनी एकाही प्रश्नाचे समाधानकारक उत्तर दिले नाही. याप्रकरणी वरिष्ठ कार्यालयाकडे तक्रारी दाखल झाल्या असून चौकशी समिती नेमण्यात आली आहे. चौकशी अहवाल सभागृहात ठेवला जाईल, असे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी सांगितले. फेरनिविदा काढण्याची विरोधकांची मागणी नगराध्यक्षांनी फेटाळली.

लोकमान्य टिळक वाचनालयाच्या सहाय्यक ग्रंथपाल स्वाती पुरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ चप्पल घालून प्रवेश केल्याच्या प्रकरणात त्यांचे निलंबन करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. वैशाली चव्हाण, दीपक चव्हाण आदींनी यासाठी जोरदार मागणी केली होती. याशिवाय नगरपालिका लेबर संजय शेळके यांचा स्वेच्छानिवृत्तीचा अर्जही मंजूर झाला. अनधिकृत नळ कनेक्शनधारकांना **(पान ४ वर..)**




**रामनवमी यात्रेसाठी पाळणे व खेळण्यांच्या निविदा ५६ लाख रुपयांना गेल्या. ठेकेदार मनमानी दर ठरवू शकतो, यामुळे गोरगरीबांना यात्रेचा आनंद मिळणार नाही, अशी भीती व्यक्त होत आहे. १०, ३० व १०० रुपयांच्या दराचे बंधन घालावे, अशी मागणी श्रीनिवास बिहानी, दिलीप नागरे, जितेंद्र छाजेड, आकाश बेग आदींनी केली. आज दुपारी ठेकेदारासोबत बैठक घेऊन चर्चा होणार आहे.**

# संपादकीय

## युद्धाचे कृष्णविवर

युद्ध हे केवळ मुत्सद्देगिरीचे अपयश नव्हे, तर संपूर्ण मानवी बुद्धिमत्तेचे आणि दूरदृष्टीचे अपयश आहे, असे तत्त्वज्ञानी नेहमीच सांगितले आहे. बहुतांश युद्धांची सुरुवात असुरक्षिततेच्या भावनेतून, स्पर्धेतून आणि परस्पर अविश्वासातून होते. युद्धाचा निर्णय सत्ताधारी आणि शक्तिशाली नेते घेतात; पण त्याचे दुष्परिणाम सामान्य नागरिकांना, अगदी युद्धात सहभागी नसलेल्या देशांनाही भोगावे लागतात. छोट्या संघर्षापासून सुरू होणारे युद्ध कसे अनियंत्रित होऊन अपरिवर्तनीय विध्वंसाकडे नेते, हे पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धांनी जगाला दाखवून दिले. तरीही मानवजात त्यातून पुरेसे धडे शिकली का, हा प्रश्न आजही तसाच उभा आहे.

अलीकडेच पश्चिम आशियात उद्भवलेल्या इराण–अमेरिका–इस्राईल युद्धाने हा प्रश्न पुन्हा एकदा तीव्रतेने उपस्थित केला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्राईलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनई यांना पहिल्याच दिवशी हवाई हल्ल्यात ठार केल्यानंतर हे युद्ध एक–दोन दिवसांत संपेल, असा त्यांचा ठाम विश्वास होता. पण हा अंदाज पूर्णपणे चुकला. तीन आठवड्यांनंतरही हे युद्ध अधिकाधिक चिघळत चालले आहे. सुरुवातीला पश्चिम आशियापुरते मर्यादित असलेले हे संघर्ष आता ब्रिटनसारख्या दूरच्या देशांपर्यंत पसरले आहे. दिएगो गार्सिया या अमेरिका–ब्रिटनच्या संयुक्त लष्करी तळावर इराणकडून क्षेपणास्त्र हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत, ज्यामुळे युरोपमधील राजधानी शहरांपर्यंत इराणच्या क्षेपणास्त्रांची व्याप्ती पोहोचू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे. युद्धाची व्याप्ती आता केवळ मध्य पूर्वापुरती मर्यादित राहिलेली नाही.

या युद्धाची सर्वांत मोठी झळ ऊर्जा क्षेत्राला बसली आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारा कच्च्या तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा इराणच्या गनिमी कारवायांमुळे खंडित झाला आहे. जगाच्या एकूण तेल पुरवठ्याच्या सुमारे एक पंचमांश भाग या सामुद्रधुनीतून जातो. इराणने या मार्गाचे 'नाक' दाबले आहे, याची अमेरिका आणि इस्राईलला पूर्ण कल्पना नव्हती. परिणामी, कच्च्या तेलाचे दर झपाट्याने वाढले आहेत. फेब्रुवारी अखेरीस भारताच्या कच्च्या तेलाच्या बास्केटचा दर सुमारे ६९ डॉलर प्रति बॅरल असताना, आता तो १४०–१४६ डॉलरच्या आसपास पोहोचला आहे. जागतिक बाजारात ब्रेंट क्रूड आणि डब्ल्यूटीआयचे दर १०० डॉलरच्या वर गेले आहेत, काही वेळा १०५–१२० डॉलरपर्यंत पोहोचले आहेत. ही वाढ ४० ते ६० टक्क्यांपर्यंत आहे, जी ऊर्जा इतिहासातील सर्वांत तीव्र आघातांपैकी एक ठरली आहे.या ऊर्जा संकटाने जगभर आर्थिक महागाईला प्रचंड वेग आला आहे. तिसऱ्या आठवड्यातच जग महागाईच्या आगीत होरपळू लागले. खतांच्या किमती ३०–४० टक्क्यांनी वाढल्या, ज्यामुळे अन्नधान्याच्या भावात मोठी झेप घेतली आहे. युरोप, चीन, भारत, जपान, दक्षिण कोरिया, तैवान यांसारख्या ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या देशांच्या औद्योगिक उत्पादनात घट झाली आहे. पुरवठा साखळ्या व्यत्यस्त झाल्याने जागतिक व्यापाराला मोठा फटका बसला आहे. होर्मुझमधील जहाजांच्या विम्याचा खर्च प्रचंड वाढला, जलवाहतुकीचे दर अवघड झाले. सुमारे साठ हजार विमानउड्डाणे रद्द झाली, हवाई वाहतूक उद्योगाला ५३ अब्ज डॉलरचे नुकसान झाले.

शेअर बाजारांना प्रचंड तोटा सहन करावा लागला आहे. जगभरातील बाजारपेठा कोसळल्या, साडेतीन ट्रिलियन डॉलरपेक्षा अधिक मूल्य नष्ट झाले. भारतीय शेअर बाजारातील एकूण मूल्य ५.५ ट्रिलियन डॉलरवरून जवळपास एक ट्रिलियन डॉलरने घसरून ४.६ ट्रिलियन डॉलरवर आले. याचा थेट परिणाम २७ कोटी मध्यमवर्गीय गुंतवणूकदारांवर पडला आहे, ज्यांचे म्युचुअल फंडांमधील ८० लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक धोक्यात आले आहे. अमेरिकेच्या कर्जात पावणेतीन ट्रिलियन डॉलरची भर पडली आहे. जागतिक व्यापाराचा वार्षिक तोटा १.२ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे, तर आर्थिक विकास दरात सव्वा दोन ट्रिलियन डॉलरची घट अपेक्षित आहे.

युद्धाचा रोजचा खर्च तीन ते चार अब्ज डॉलर असून, एकूण खर्च दोनशे अब्ज डॉलरच्या घरात जाण्याची शक्यता आहे. हे युद्ध केवळ जीवितहानी आणि आर्थिक नुकसानापुरते मर्यादित नाही; समाजमन, विश्वास आणि भविष्याबाबतची आशा यांनाही गंभीर धक्का बसला आहे. ट्रम्प, नेतान्याहू आणि इराणच्या नेत्यांसह कोणत्याही राष्ट्रप्रमुखाला या युद्धाच्या अंतिम हानीचा अंदाज नव्हता. पण आतापर्यंतची जीवित आणि आर्थिक हानी डोळे विस्फारणारी आहे.

आयातशुल्क युद्धाने आधीच जर्जर झालेल्या जागतिक अर्थव्यवस्थेला हे युद्ध प्रचंड वेगाने कृष्णविवरात ढकलत आहे. पैसा, संसाधने आणि मानवी क्षमता यांचा प्रचंड नाश होत आहे. तरीही इतिहास सांगतो की, युद्धातून काही नवे शोध आणि तंत्रज्ञान जन्म घेतात – इंटरनेट, विमानतंत्रज्ञान, अणुऊर्जा यांसारखे. पण अशा प्रगतीसाठी एवढा विध्वंस का आवश्यक आहे? हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात उमटतो.

# भावी पिढीला भौतिक सुखांपेक्षा संस्कार द्या : भास्करगिरी महाराज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : भावी पिढीला केवळ भौतिक सुखसुविधा देण्यापेक्षा चांगले संस्कार देणे अधिक महत्त्वाचे आहे. मातृ–पितृ पूजनासारखे सोहळे कुटुंबातील नातेसंबंध दृढ करून पुढील पिढीला योग्य मार्ग दाखवतात, असे प्रतिपादन देवगड देवस्थानचे भास्करगिरी महाराज यांनी केले.

भगवान गुरु दत्ताच्या छायेखाली कौटुंबिक जडणघडण झालेल्या गयाबाई पोपटराव कारले यांच्या अमृतमहोत्सवी अभिष्टचिंतन सोहळ्यात ते बोलत होते. रामनाथ कारले व कारले कुटुंबीयांनी या सोहळ्याचे आयोजन केले होते.




यावेळी भास्करगिरी महाराज, प्रकाशानंदगिरी महाराज, वेदांताचार्य भगवानजी महाराज जंगले शास्त्रीजी (श्रीराम कृष्ण आश्रम, गोणेगाव), ह.भ.प. विद्याताई हारदे, कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा पंचगंगा उद्योग समूहाचे संचालक बाळासाहेब शिंदे, कृषी उपसंचालक दीपक गवळी, उपविभागीय कृषी अधिकारी अश्विनी पठारे, जनाबाई जंगले, रोहिदास चौधरी, डॉ. शशिकांत विप्रदास, संतोष भामरे, विक्रम गोसावी, सतीशकुमार संचेतीशास्त्री आदी उपस्थित होते.

अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत आणि स्वतः अशिक्षित असतानाही धार्मिक संस्कारांच्या बळावर मुलगा व नातवंडांना उच्च शिक्षण देण्याचा ध्यास पूर्ण करणारी माता म्हणून श्रीमती गयाबाई कारले पंचक्रोशीत परिचित आहेत, असे गौरवोद्गार यावेळी मान्यवरांनी काढले.

या सोहळ्यास कारले कुटुंबीयांचे नातेवाईक, कृषी क्षेत्रातील अधिकारी तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमात श्रीमती गयाबाई कारले यांच्यासह खुपटी येथील शिक्षकांचाही सत्कार करण्यात आला. अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त फुलांनी सजवलेल्या तराजूमध्ये त्यांची ग्रंथतुला व पेढेतुला करण्यात आली.

प्रमुख आशीर्वादपर भाषणात भास्करगिरी महाराज म्हणाले की, वृद्धाश्रमांचा अभिमान बाळगण्यापेक्षा घरातील वृद्धांची सेवा करणे हेच खरे कर्तव्य आहे. मातृ–पितृ पूजनासारखे कार्यक्रम भावी पिढीला संस्कार देणारे ठरतात. पालकांनी मुलांना भौतिक सुविधा देण्याबरोबरच संस्कारांची शिदोरी दिली तरच आपली संस्कृती टिकेल.

प्रकाशानंदगिरी महाराज म्हणाले की, वृद्ध आई–वडिलांची सेवा म्हणजे सर्व तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेतल्याइतके पुण्य मिळवण्यासारखे आहे. मुलांना केवळ पैसा कमावणारी यंत्रे बनवण्यापेक्षा संस्कारांनी समृद्ध बनवावे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेवन्नाथ पवार यांनी केले, तर आयोजक रामनाथ कारले यांनी आभार मानले.

# पद्मश्री विखे सैनिक स्कूलचे अनेक विद्यार्थी राष्ट्र सेवेत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला सर्वोच्च महत्त्व प्राप्त झाले आहे. शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त, नेतृत्वगुण आणि राष्ट्रभक्ती यांचा संगम घडवणारी संस्था म्हणजे सैनिक स्कूल. देशसेवेसाठी सक्षम, कर्तव्यदक्ष आणि शिस्तबद्ध अधिकारी घडवणे हे सैनिक स्कूलचे मुख्य ध्येय आहे. आणि हाच उद्देश प्रवरे पद्मश्री हाच उद्देश पर्वत प्रवरे सार्थक होत असल्याचे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य राजेश माघाडे यांनी केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्यापद्मश्री डॉ. विखे पाटील सैनिक स्कूलचे उद्दिष्ट केवळ शिक्षण देणे इतकेच मर्यादित नसून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, संघभावना आणि देशभक्ती विकसित करणे आहे. या शाळांमधून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण अकादमी तसेच इतर



संरक्षण दलांमध्ये अधिकारी म्हणून प्रवेश मिळवण्यासाठी विशेष मार्गदर्शन दिले जाते. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सैनिक स्कूलने आपल्या उत्कृष्ट कार्यातून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. या संस्थेतून घडलेले अनेक विद्यार्थी आज भारतीय लष्करात मेजर, कॅप्टन, कमांडर, लेफ्टनंट, कमांडंट अशा उच्च पदांवर कार्यरत आहेत. एवढेच नव्हे, तर अनेक माजी विद्यार्थी आय. ए.एस, उद्योगक्षेत्र, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्रातही उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. काही विद्यार्थ्यांनी परदेशात जाऊनही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे.

महाराष्ट्रातील सर्वोत्तम सैनिक स्कूलपैकी एक म्हणून ओळख मिळवलेली ही संस्था अखिल भारतीय सैनिक स्कूल सोसायटी, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्याशी संलग्न आहे. अत्याधुनिक सुविधा, उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण आणि किफायतशीर शुल्क यामुळे ही शाळा पालकांसाठी एक उत्तम पर्याय ठरते. शाळेमध्ये क्रीडा आणि सहशालेय उपक्रमांना विशेष महत्त्व दिले जाते. हॉर्स रायडिंग, बॉक्सिंग, स्विमिंग, रायफल शूटिंग, धनुर्विद्या यांसारख्या विशेष क्रीडा प्रकारांसोबतच बास्केटबॉल, फुटबॉल, हँडबॉल, कबड्डी, खो–खो यांसारख्या खेळांसाठी उत्तम सुविधा उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांसाठी आधुनिक वसतिगृह, स्वच्छ आणि पौष्टिक शाकाहारी व मांसाहारी भोजनासाठी केंद्रीकृत मेसची सुविधा देखील उपलब्ध आहे.

याशिवाय, व्यक्तिमत्व विकासासाठी विशेष प्रशिक्षण, तसेच छूअ परीक्षा व डडइ मुलाखतीसाठी पुण्यातील नामांकित संस्थांमार्फत मार्गदर्शन दिले जाते. यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊन ते भविष्यात सक्षम नागरिक आणि यशस्वी अधिकारी बनतात. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे, कॅम्पस संचालक डॉ. महेश खर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली सैनिकी स्कूलच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले जातात.

# लांडेवस्ती शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापुर** : लांडेवस्ती (केंद्र – डवाळा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाचा कलाविष्कार हा कार्यक्रम विवीध सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपन्न झाला – प्रथम मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन केले. मान्यवरांचे स्वागत झाल्यानंतर यावेळी गणपती गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली विविध हिंदी, मराठी गीतांनी कलाविष्कार कार्यक्रमाला रंगत आली. कार्यक्रमासाठी, मुख्याध्यापक सुमेध सरकटे, प्रविण म्हस्के, शालेय समितीचे अध्यक्ष शिवाजी लांडे, वैशाली सुराशे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, जिल्हा परिषर सदस्य पंकज ठोंबरे पंचायत समिती सदस्य राहुल लांडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत त्रिभुवन, विकास सोसायटी चेअरमन बाबासाहेब लांडे, जगन्नाथ त्रिभुवन, नानासाहेब जाधव गुरुजी, नारायण साळुंखे, विशाल साळुंखे, शालेय समिती अध्यक्ष शिवाजी लांडे यासह पालक व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




# गोगलगाव येथे फिरता एक दिवसीय नारळी सप्ताहाला भाविकांची मांदियाळी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील गोगलगाव येथे फिरता एक दिवशीय नारळी सप्ताहाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.यावेळी संत महंतांसह भाविकांची मोठी मांदियाळी जमली होती.यावेळी संत महंतांच्या उपस्थितीत काढण्यात आलेल्या शोभायात्रा मिरवणुकीचे गोगलगावकरांनी उत्स्फूर्त स्वागत केले.संत विचारांमध्येच मानवी जीवाच्या सुखाचा मार्ग असल्याचे प्रतिपादन सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत गुरुवर्य श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांनी यावेळी झालेल्या कीर्तनात बोलतांना केले. श्री संत ब्रम्हलीन सद्गुरु नारायणगिरी महाराज व श्री संत दत्तगिरीजी महाराज (बाळकृष्ण



बाबा) यांच्या स्मृती प्रित्यर्थ नेवासा तालुक्यातील गोगलगाव येथील मते वस्तीवर संपन्न झालेल्या एकदिवसीय फिरता नारळी सप्ताह व पुण्यतिथी सोहळयानिमित्त सकाळी ८ वाजता गोगलगाव येथे भगवान पांडुरंग व श्री हनुमंतरायांची विधिवत पूजा करण्यात आली. नंतर गोगलगाव ते मते वस्ती असा पायी दिंडी शोभायात्रेचे गोगलगावकरांनी उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी ब्रम्हलीन सदगुरू नारायणगिरी महाराज व ब्रम्हलीन सदगुरू दत्तगिरीजी महाराज यांच्या प्रतिमेसह उपस्थित संत मंडळींच्या हस्ते पादुकांचे पूजन करण्यात आले.कीर्तनानंतर महंत कैलासगिरी महाराज व महंत ऋषिनाथ महाराज यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मते परिवाराच्या वतीने उपस्थित संत,महंत,महाराज मंडळींचे संतपूजन करण्यात आले.

यावेळी जेष्ठ कीर्तनकार ह.भ.प.गोविंद महाराज मोरे यांना उपस्थित संत, महंत, महाराज मंडळींच्या हस्ते ''सदगुरु स्मृती पुरस्कार'' देऊन गौरविण्यात आले.

पुण्यतिथी सोहळा संयोजक संपतराव मते पाटील, रुस्तुम मते, बाळासाहेब मते परिवाराचा गुरुवर्य बाबा ह.भ.प.महंत उद्धवजी महाराज मंडलिक, नेवासेकर व महंत कैलासगिरी महाराज यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.संतसेवक बाळासाहेब झिने यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## कानिफनाथ महाराज यात्रोत्सवात आमदार अमोल खताळ यांची भव्य लाडू तुला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : तालुक्यातील घुलेवाडी येथे कानिफनाथ महाराज यात्रोत्सवाच्या निमित्त शिवसेना युवासेना आणि महायुती कार्यकर्त्यांकडून आमदार अमोल खताळ यांच्या वजनाएवढे लाडू अर्पण करून लाडू तुला करण्यात आली.घुलेवाडी येथील महायुती कार्यकर्त्यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी आमदार खताळ यांना मोठ्या मता धिक्याने विजयी करण्यासाठी कानिफनाथ महाराजांना नवस केला होता. तो नवस पूर्ण झाल्यानंतर कानिफनाथ महाराज यात्रोत्सवाचे औचित्य साधून हा आमदार खताळ यांना वजन काट्यात बसवून त्यांच्या वजनाएवढे लाडू ठेवण्यात आले .या लाडूतुला कार्यक्रमासाठी परिसरातील भाविक आणि कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. कानिफनाथ महाराज की जय च्या घोषणांनी वातावरण भक्तिमय झाले होते. कार्यक्रमानंतर हे लाडू उपस्थित भाविकांना प्रसाद म्हणून वाटप करण्यात आले.यावेळी राष्ट्रवादी महिला जिल्हाध्यक्ष वैशाली राऊत, शिवसेना शाखाप्रमुख शरद पानसरे, सिताराम पानसरे, स्वरूप राऊत, स्वप्निल राऊत, संजय पानसरे, राजश्री वाकचौरे, सारंगधर पानसरे, कैलास काशीद, बाळासाहेब राऊत, सतीश भेंडाळे, ओंकार राऊत, विकास राऊत, शुभम सातपुते, विशाल फटांगरे यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते तसेच घुलेवाडी ग्रामस्थ उपस्थित होते.

जनतेने दिलेल्या अपार प्रेम, विश्वास आणि पाठिंब्यामुळेच मला संगमनेर तालुक्याचे लोकप्रतिनिधित्व करण्याची अमूल्य संधी मिळाली आहे. ही जबाबदारी माझ्यासाठी केवळ पद नसून, जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे एक मोठे कर्तव्य आहे. तालुक्याचा सर्वांगीण विकास करणे, प्रत्येक घटकापर्यंत प्रगती पोहोचवणे आणि सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावणे हेच माझे मुख्य ध्येय आहे. घुलेवाडीकरांनी केलेला सन्मान आणि दाखवलेले प्रेम हे माझ्यासाठी प्रेरणादायी असून, यामुळे मला अधिक जोमाने आणि निष्ठेने काम करण्याची ऊर्जा मिळते.



# काजीबाबा उरूस कमिटी नगरसेवक दिलीप नागरे तिसऱ्यांदा अध्यक्ष

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहरातील काजी बाबा उरूस कमिटीच्या अध्यक्षपदी श्रीरामपूर नगरपालिकेचे ज्येष्ठ नगरसेवक माजी उपनगराध्यक्ष दिलीप नागरे यांची तिसऱ्यांदा निवड करण्यात आली आहे.

श्रीरामपूर नगरपालिकेचे गटनेते ज्येष्ठ नगरसेवक हाजी मुजफ्फर शेख यांनी दर्गाह उरूस कमिटी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत नागरे यांच्या निवडीची सूचना मांडली त्यास उपस्थित सर्वांनी टाळ्यांच्या गजरात अनुमोदन दिले. त्यानंतर ही घोषणा करण्यात आली.

काजी बाबा यांच्या आगामी काळात भरविण्यात येणाऱ्या उरूस आणि कवाल्यांचे नियोजन करण्यासंदर्भात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत शहर काजी मौलाना अकबर अली यांनी काजी बाबा यांच्या अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला.यावेळी असंख्य भक्तांनी कवाल्यांचे नियोजन तसेच विविध उपाय योजना संदर्भात मौलिक सूचना केल्या. मुजफ्फर शेख यांनी या सर्व त्या सूचनांचे स्वागत केले.



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संदल उरूस मोठ्या भक्ती भावाने साजरा करण्यासंदर्भात सर्वांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी मुजफ्फर शेख, दानिश शेख यांनी केले.

बैठकीस फतेह यंग सर्कल, सरकार ग्रुप, अल्बा ग्रुप, सुभेदार सोशल ग्रुप, अल्नुर युथ फौंडेशन, के.जी. एन. ग्रुप, एकता यंग सर्कल, संजेरी फ्रेंड ग्रुप, मौलाना आझाद युथ फौंडेशन, एस.के. ग्रुप, गरीब नवाज फौंडेशन, च्या पदाधिकाऱ्यांसह दानिश शेख, एजाज इनामदार, नगरसेवक लकी सेठी, हाजी साजिद मिर्झा, पत्रकार हाजी शफीक बागबान, पत्रकार असलम बिन्साद, बरकतअली शेख, अलनूर यंग ग्रुपचे अध्यक्ष जावेद शेख, मुदस्सर पटेल, फय्याज बागवान, शाहरुख बागवान, मेहबूब कुरेशी, अल्ताफ शेख, हमीद पटेल, राजू मिर्झा , सलीम टर्नर, जाकीर जहागीरदार, रशीद पांडे, दिनमोहमद शेख, समीर खान, मुख्तार काझी, इरफान जीवनी, अजय कदम, मनोज गुप्ता, सागर घोरपडे, विकी शर्मा, अगस्ती त्रिभुवन, आशिक आली, नाजीम पिरजादे आदींसह असंख्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित असंख्य भक्तांनी स्वइच्छेने वर्गणी दिली. या संदर्भात मुजफ्फर शेख यांनी या सर्वांचे मनापासून आभार मानले.

# राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत

## सुरज यादवने २ सुवर्ण, १ रजत पटकाविले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर,** : चंदीगड (पंजाब) येथील राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हयातील श्रीरामपूर येथील जलतरणपटू सुरज यादव याने दोन सुवर्णपदक, एक रजतपदक पटकाविले आहे.




खेलो इंडियाचे वतीने राष्ट्रीय जलतरण स्पर्धेचे आयोजन चंदीगड येथील गव्हर्नमेंट योगा कॉलेजचे जलतरण तलाव याठिकाणी दि. २२ मार्च २०२६ रोजी करण्यात आले होते. पारितोषीक वितरण समारंभ गव्हर्नमेंट कॉलेज चंदिगड येथे पार पडला. यावेळी खेलो इंडियाचे महाराष्ट्र राज्य जनरल सेक्रेटरी अमन चौधरी यांचे हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. सुरज यादव याचे आरबीएनबी कॉलेजचे प्राध्यापक ढेरे तसेच सर्व शिक्षकवृंद, मिनाताई जगधने, तसेच बेलापूर रेल्वे स्टेशनचे शाखा प्रबंधक एम पी पाण्डेय, बेलापूर रेल्वे स्टेशनचे इन्स्पेक्टर विधांशू सिंह, टि.सी. पवन सर ज्ञानसाई हेल्थ क्लबचे संस्थापक सतिश गवारे, अध्यक्ष अभिषेक गवारे, तसेच सचिन गवारे, नगरपरिषदेचे नगराध्यक्ष करण ससाणे, सचिन गुजर, आ. हेमंत ओगले, नगरसेवक आकाश बेग, रवि पाटील, महंता यादव, श्रीकृष्णनगर यांनी अभिनंदन केले आहे.

# ध्येयाच्या ध्यासाने झपाटलेला अवलिया किरण पाटील यांची प्रेरणादायी भेट

रविवार, दिनांक २२ मार्च २०२६. नाशिक जिल्ह्यातील बसवंत पिंपळगाव येथे अचानक भावाच्या साल्याच्या दुःखद घटनेमुळे जाणे झाले. काम आटोपून परत येत असताना खोकर गावाजवळ भावाच्या साल्याच्या बागेसाठी ४–५ द्राक्ष रोपे घेण्याची इच्छा झाली.पिंपळगाव बसवंत हे ठिकाण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सतत काहीतरी नवीन खुनवत असते. जगातील अवलिया लोक आपली ओळख लपवून लक्ष्याच्या मागे धावत असतात.परतीच्या प्रवासात रस्त्याच्या कडेला दोन–तीन ठिकाणी रोपांची चौकशी केली. चार–पाच द्राक्ष रोपे मिळतील का? पण सगळीकडे नाहीच उत्तर. असेच पुढे जात असताना ग्राफटेक प्लांट्स असा फलक दिसला. चला, येथे तरी विचारूया, म्हणून थांबलो. रोपांची विचारणा करत असताना एक मजूर म्हणाला, येथे काही भेटणार नाही, पण मी संबंधित व्यक्तीला फोन करतो. त्याने फोन केला आणि लगेच एक सडपातळ, दाढी वाढलेली, टी–शर्ट व नाईट पॅन्ट घातलेली, अगदी सर्वसामान्य दिसणारी व्यक्ती समोर आली. त्यांना द्राक्ष रोपांबाबत विचारले तर, आमच्याकडे देण्यासाठी रोपे नाहीत. पण दुसऱ्या रोपवाटिकेचा नंबर व लोकेशन देतो, एवढ्या आपुलकीने सांगितले. नंतर आमची विचारपूस केली. आम्ही ओळख सांगितली तर ते हसून म्हणाले, तुम्ही तर ऊस पट्ट्यातील माणसं!

या एका वाक्याने चर्चेला सुरुवात झाली.चर्चा हळूहळू शेती, शेतकरी, पिकांची निवड, निगा, पाणी व्यवस्थापन, माती, खत, औषध, पिकांची वाढ, काढणी, बाजारपेठ, भाव, उत्पादन व उत्पन्न... प्रत्येक मुद्द्यावर ते आत्मविश्वासाने बोलत होते. विज्ञान–तंत्रज्ञान, पुस्तकी ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव यांचा सुंदर मेळ! थोडक्यात पण अर्थपूर्ण, जमिनीवर राहून वस्तूस्थिती ग्राह्य धरून सांगत. नंतर ते पुढे जात असताना सांगू लागले... आम्ही कुतूहलाने ऐकत होतो. हा शेततळ भारतातील पहिला शेततळ... ३–५ कोटी लिटर क्षमतेचा! मी तर आश्चर्यचकित! ८–१० आंतरराष्ट्रीय द्राक्ष व्हरायटी स्वतः विकसित करून



पेटंट मिळवलेले. रोपे फक्त चार दिवसांत हाऊसफुल्ल बुकिंग. एक किलोची आंतरराष्ट्रीय किंमत ३५०० ते ४००० रुपये, तरीही कमीच वाटते कारण मागणी प्रचंड! सर्व शेती शेंद्रीय, कमीत कमी रासायनिक खतांचा वापर.माझे बंधू राजू शेख (मालुंजा) यांनी युरिया खताबाबत विचारले तर त्यांनी पुराव्यासह विस्तृत माहिती दिली. प्रत्येक विभाग दाखवत होते... अगदी आई घरातील प्रत्येक वस्तू व्यवस्थित ठेवते तसे! कामगारांना फोनवर नंबर सांगितले की सामान लगेच मिळते. वेळेचे काटेकोर नियोजन. हवामान कसेही असले तरी द्राक्ष खराब होणार नाहीत. कोणतीही सबसिडी नाही!

१९८६ साली ७ एकरापासून सुरुवात, आज ५२ एकर एकाच ठिकाणी. संपूर्ण आधुनिक शेड, एअरकंडिशन, सॅनिटायझेशन. कामगारांना अप्रॉन घालून, सॅनिटायझ होऊनच प्रवेश. रोपांना हात लावण्यापूर्वी कडक नियम! पाणी व्यवस्था ऑटोमॅटिक 'औरो' सिस्टिमने, एका कंट्रोल रूममधून संपूर्ण क्षेत्रात अगदी तेवढेच पाणी. अतिरेक नाही. शरद पवार यांनी दोन वेळा आवर्जून भेट दिलेली.

रोपवाटिकेसाठी १२ कोटी गुंतवणूक. भारत सरकारचे 'थ्री स्टार' गुणांकन – भारतातील पहिले! इतर फार्म्सना फक्त दोन स्टार. एका पेटंटेड व्हरायटीसाठी तीन वर्षांसाठी ३५०० रुपये प्रति किलो दराने करार, सरासरी १५ टन उत्पादन.ते पीपीएस प्रवरानगरचे विद्यार्थी, १९८६ साली सीओपी कॉलेजमधून मेकॅनिकल इंजिनियरिंग पूर्ण. फार्म दाखवताना वाटले, आपण शेतीत अजून ५० वर्षे मागे आहोत!

शेवटी ते म्हणाले, माझा महाल दाखवतो. पत्राचे घर... डोक्याला हात लावला! भेटीच्या प्रथमदर्शनी सर्वसामान्य वाटणारे, अंती असामान्य अवलिया! ध्येयाच्या ध्यासाने झपाटलेला, एक सेकंदही वाया न गेलेला क्षण. रमजानची धावपळ, लांब प्रवास, थकवा...


पण त्या भेटीत वेळ कसा निघून गेला समजलेच नाही. मनोमन वाटले, हे खरेच अवलिया! ध्येयवेड्या व्यक्तिमत्त्वाला सलाम!

**लेख : डॉ. सलीम सिकंदर शेख**
**बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना, श्रीरामपूर**
**मोबाईल: ९२७१६४००१४**

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## गुंजाळवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहास गुरुवारपासून प्रारंभ



**संगमनेर** : तालुक्यातील गुंजाळवाडी (राहणे मळा) येथील हनुमान मंदिरात गुरुवार (दि. २६ मार्च) ते २ एप्रिल २०२६ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहात सात दिवस महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार व प्रवचनकार यांची कीर्तने व प्रवचने होणार असून आमदार अमोल खताळ व सौ. नीलम खताळ यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यामध्ये रामायणाचार्य निवृत्ती महाराज रायते, जयश्रीताई तिकांडे, ज्योतीताई धनाडे, सागर महाराज दिंडे, दत्तात्रय महाराज धुमाळ, संदीप महाराज खडांगळे व अनिल महाराज देवळेकर यांची कीर्तने होणार आहेत.

तसेच ईश्वरीताई जाधव, पायलताई चकोर, सृष्टी महाराज कासार आदींची प्रवचने होणार आहेत. गुरुवार (दि. २ एप्रिल) रोजी भागवताचार्य पोपट महाराज राक्षे यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होऊन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## जीवनात संयमी वृत्ती हवी : प्रविणऋषी महाराज

**श्रीरामपूर** : जीवनामध्ये संयमी वृत्ती असलीच पाहिजे, राग नको. तरच जीवन आनंदी व सफल होईल. दुसर्यांना क्षमा करावी. दुसर्यावर प्रेम कराल तर तुम्हाला दुसर्याकडून प्रेम मिळेल, असे विचार अर्हम विज्जा प्रणेता उपाध्याय प्रवर पु. प्रविणऋषी महाराज यांनी प्रवचनातून व्यक्त केले. श्रीरामपूरच्या जैन स्थानकामध्ये उपाध्याय प्रवर पु. प्रविणऋषी त्यांचे शिष्य पु. तिर्थेशऋषी व राष्ट्रसंत आचार्य पु. आनंदऋषी यांच्या अज्ञानुवर्तीनी पु. प्रितीदर्शना व त्यांच्या ५ सुशिष्या यांचे वास्तव असून श्री भगवान महावीरांच्या उपदेशपर बोलतांना पु. प्रविणऋषी प्रवचनातून बोलत होते. ते यावेळी म्हणाले की, राग हा माणसाचा शत्रु आहे.

तो जीवन बरबाद करतो. रोगावर औषध घेण्यापेक्षा रोग होऊच नये. म्हणून प्रयत्न करा. संत ज्ञानेश्वरांनी मानव जातीच्या कल्याणासाठी बंधुभाव वाढीसाठी व माणसातील वाईट वृत्ती नष्ट होण्याकरिता पसायदान मागितले. तीन सर्वश्रेष्ठ प्रार्थना आहे. ज्ञानेश्वरांचे कार्य आदर्श आहे, असे त्यांनी प्रवचनातून स्पष्ट केले.

## लोणीच्या फिजिओथेरपिस्ट ची राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत उल्लेखनीय सेवा



**लोणी** : वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनतर्फे लोणावळा येथील सिंहगड स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय सीनियर पुरुष फुटबॉल लीग स्पर्धेत, लोणी येथील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या डॉक्टरांनी खेळाडूंना उत्कृष्ट वैद्यकीय सेवा दिली असल्याची माहीती प्राचार्य डॉ. आर. के. सिन्हा यांनी दिली. या प्रतिष्ठेच्या स्पर्धे त महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील आणि नामांकित फुटबॉल क्लबचे सुमारे १८० खेळाडू सहभागी झाले होते.

यामध्ये इंडिया ऑन ट्रॅक, मुंबई एफसी, नाशिक युनायटेड यांसारख्या बलाढ्य संघांचा समावेश होता. खेळाचा वेग आणि तीव्रता लक्षात घेता, खेळाडूंच्या सुरक्षिततेसाठी आणि दुखापत व्यवस्थापनासाठी प्रवरा अभिमत विद्यापीठाच्या स्पोर्ट्स फिजिओथेरपी विभागातील डॉ. मोहित अग्रवाल आणि डॉ. प्रणव गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली होती. स्पर्धेदरम्यान मैदानावर झालेल्या दुखापतींचे तत्काळ व्यवस्थापन, प्रथमोपचार आणि खेळाडूंच्या जलद पुनर्वसनाची जबाबदारी या डॉक्टरांनी अत्यंत प्रभावीपणे पार पाडली.

## हनुमंतगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह

**सोनगाव** : राहाता तालुक्यातील हनुमंतगाव येथे रामनवमी ते हनुमान जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताहास गुरुवार (दि. २६ मार्च) पासून प्रारंभ झाला आहे. ब्रम्हलीन सदगुरू नारायणगिरी महाराज व मणिकगिरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने ग्रामदैवत हनुमंतराय मंदिरात हा धार्मिक सोहळा होत असून परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. सप्ताहानिमित्त मंदिरात आकर्षक सजावट व रोषणाई करण्यात आली असून दररोज काकडा, ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम गाथा भजन, हरिपाठ, कीर्तन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवारी ह.भ.प. दत्तगिरीजी महाराज यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. सप्ताहात मुक्ताताई दिघे, अनिताताई जाधव, ज्योतीताई पवार, उत्तम महाराज गाढे आदी कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहे. ३ एप्रिल रोजी भागवत महाराज सातभाये यांचे काल्याचे कीर्तन होणार असून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहास भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# ८५ किलोवॅट सौर ऊर्जा प्रकल्प लोकार्पण

### भेंडा–कुकाणा जिल्ह्यातील चांगली व सक्षम पाणी योजना : पांडुरंग अभंग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**भेंडा** : जिल्ह्यातील अनेक पाणी योजना बंद पडल्या, अनेक योजना वेगवेगळ्या कारणांमुळे अडचणीत आलेल्या असतांनाही भेंडा–कुकाणा व इतर चार गावांची नळ पाणी योजना ही जिल्ह्यातील एक चांगली व सक्षम पाणी पुरवठा योजना असल्याचे प्रतिपादन माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी केले. नेवासा तालुक्यातील भेंडा बुद्रुक येथील भेंडा–कुकाणा व इतर ४ गावांच्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेकरिता बसविण्यात आलेल्या ८५ किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे माजी आमदार पांडुरंग अभंग यांचे हस्ते लोकार्पण करण्यात आले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात अभंग बोलत होते.

तुकाराम मिसाळ, दत्तात्रय काळे, अशोक मिसाळ, डॉ.शिवाजी शिंदे, बलभीम फुलारी, सरपंच–प्रशासक सुहासिनी मिसाळ,पाणी योजनेचे उपाध्यक्ष संदीप देशमुख व्यासपीठावर उपस्थित होते. अभंग पुढे म्हणाले की, भाजप–सेना युक्ती सरकारच्या काळात मी आमदार असतांना प्रयत्न करून भेंडा–कुकाणा व इतर ४ गावांच्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेला मंजूरी मिळवली, लोकनेते मारुतराव घुले पाटील यांनी या योजने करिता ज्ञानेश्वर कारखान्याची १८ एकर जमीन दिली. त्यामुळे १९९८ मध्ये या योजनेचे भूमिपूजन होऊन काम सुरू झाले.

निधी अभावी काम रखडले असतांना २००० मध्ये माजी आमदार नरेंद्र घुले यांनी अजितदादा पवार यांचे कडे पाठपुरावा करून निधी मिळविल्याने २००५ मध्ये योजना पूर्ण होऊन ती कार्यान्वियीत होऊन नळाव्दारे घराघरात पाणी पोहचले. वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन तत्कालीन जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी जलजीवन मिशन अंतर्गत २१ कोटी रुपयांची मान्यता मिळवून दिल्याने सहा गावात उंच पाणी टाक्या व अंतर्गत पाणी पुरवठा पाईप लाईनची कामे सध्या सुरू आहेत. सर्वांच्या सहकार्याने २५ वर्षा पासून ही पाणी योजना सुरळीत सुरू आहे.

८५ किलोवॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प पूर्ण झाल्याने पाणी योजनेच्या सर्व पंपा करिता लागणारी ८२.५ किलोवॅट विजेची गरज पूर्ण होऊन वीज बिलात ५० टक्के बचत होणार आहे. या कार्यक्रमाला नामदेव निकम, पंढरीनाथ फुलारी, अशोक वायकर, नामदेव शिंदे, सोमनाथ कचरे, दादासाहेब गजरे,रामचंद्र गंगावणे, डॉ. संतोष फुलारी,डॉ.लहानू मिसाळ,मुकुंद अभंग, यडूभाऊ सोनवणे, रोहिदास आढागळे, भेंड्याचे ग्रामविकास अधिकारी रेवनाथ भिसे, कुकाण्याचे ग्रामविकास अधिकारी – बाळासाहेब आगळे, महावितरणचे सहाय्यक अभियंता जितेंद्र मालसुरे, सौर प्रकल्प ठेकेदार कल्याण रंधे, दाणेकर, नितीन कांबळे, पाणी योजनेचे कर्मचारी भाऊसाहेब जगताप,वसंत जगताप, शरद शिंदे,अण्णासाहेब गोर्डे, कचरू निसरगे आदी यावेळी उपस्थित होते. बाबासाहेब गोर्डे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.शिवाजी शिंदे यांनी प्रास्ताविक केले. किशोर मिसाळ यांनी आभार मानले

## नेवासा नगरपंचायतवर मोकळ्या हंडयासह दंडुका मोर्चा काढणार : अ‍ॅड. संजय सुखदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : गेली अनेक दिवसापासून नेवासा शहर व उपनगरात वारंवार अनियमित म्हणजेच आठ ते दहा दिवसाला पाणीपुरवठा होत आहे वेळोवेळी सांगून ही पाणीपुरवठा नियमित करण्यात नेवासा नगरपंचायत असमर्थ ठरली असल्याने त्याचा निषेध म्हणून नेवासा नगरपंचायतवर अचानकपणे मोकळ्या हंडयासह दंडुका मोर्चा काढणार असल्याचा ईशारा जनसेवक व आम आदमी पार्टीचे नेते अ‍ॅड. संजय सुखदान यांनी मुख्याधिकारी निखिल फराटे यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

मुख्याधिकारी निखिल फराटे यांना दिलेल्या निवेदनात संजय सुखदान यांनी म्हटले आहे नेवासा शहर व उपनगरातील नागरिकांना आठ ते दहा दिवसाला पाणी पुरवठा होत आहे,वारंवार सांगून ही पाणी पुरवठा सुरळीत केला जात नाही,त्यामुळे आम्ही नेवासकर नागरिक या परिस्थितीची आपल्या जाण होण्यासाठी नेवासा नगरपंचायत कार्यालयावर हंड्यासह दंडुका मोर्चा काढून अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांवर काळी शाही टाकण्याचे आंदोलन करणार आहोत,कारण ही काळी शाई टाकल्यानंतर आपल्याला कपडे धुण्यासाठी व आंघोळ करण्यासाठी पाणी मिळते की नाही हेही आम्हाला बघायचे आहे असे ही निवेदनात इशारा देतांना स्पष्ट केले आहे.

सदर मोर्चाची तारीख मी आपणास दिल्यास आपण अनुपस्थितीत राहाल म्हणून निवेदन दिल्यापासून आठ दिवसापर्यंत ज्या दिवशी आपण उपस्थित असाल त्या दिवशी अचानकपणे येऊन मोर्चा काढणार आहोत. आणि आपल्या वर व पदाधिकाऱ्यांवरही काळी शाही टाकणार आहोत याची आपण दखल घ्यावी आणि सदर मोर्चातून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्या सर्वस्वी आपणच जबाबदार आहात असे आम्ही मानतो असा ईशारा निवेदनात देण्यात आला आहे.

तात्काळ पाणीपुरवठा नियमित करण्यात आला आहे याची खात्रीशीर लेखी स्वरूपात आम्हाला कळवावे अन्यथा वरील अचानक आंदोलन हे होणारच असा ईशारा संजय सुखदान यांनी मुख्याधिकारी निखिल फराटे यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

## कोल्हार भगवतीपूर शाळेसाठी कलर प्रिंटर देणगी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : शिक्षणाच्या दर्जात भर घालण्यासाठी व विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधांचा लाभ मिळावा या उद्देशाने कोल्हार भगवतीपूर येथील जि प प्राथमिक शाळेसाठी कलर प्रिंटर खरेदीसाठी देणगी सुपूर्त करण्यात आली. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. सुनीता व दत्तात्रय रंभाजी राऊत (सेवानिवृत्त तालुका कृषी अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते) स्वतः शिक्षण घेताना ज्या ज्या अडचणी आल्या त्या अडचणी इतर विद्यार्थ्यांना येऊ नये म्हणून स्वतः पुढाकार घेऊन शनिवार दिनांक २१ मार्च २०२६ रोजी हा उपक्रम राबविण्यात आला. मा. नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील (जलसंपदा मंत्री व पालकमंत्री, अहमदनगर जिल्हा) यांच्या शुभहस्ते रुपये ११,००० ची देणगी शाळेसाठी सुपूर्त करण्यात आली. ही देणगी साहेबराव अनाप, मुख्याध्यापक, जि.प. प्राथमिक शाळा, कोल्हार भगवतीपूर यांच्याकडे देण्यात आली असून या निधीतून शाळेसाठी कलर प्रिंटर खरेदी करण्यात येणार आहे. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना प्रकल्प, नोंदी, शैक्षणिक साहित्य व विविध उपक्रमांसाठी दर्जेदार प्रिंटआउट उपलब्ध होणार आहेत. या प्रसंगी आण्णासाहेब म्हस्के (माजी मंत्री व संचालक, अहमदनगर जिल्हा सहकारी बँक), दत्तात्रय कराळे (विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र) तसेच सोमनाथ घार्गे (पोलीस अधीक्षक, अहमदनगर), सोमनाथ वाघचौरे अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर विभाग यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत शिक्षण क्षेत्रासाठी अशा सामाजिक उपक्रमांची गरज अधोरेखित केली. शाळेच्या विकासासाठी स्थानिक पातळीवर होत असलेले असे सहकार्य निश्चितच प्रेरणादायी असून यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सकारात्मक बदल घडणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## रयत शैक्षणिक संकुलात विविध उद्घाटन व भूमिपूजन समारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : येथील रयत शैक्षणिक संकुलामध्ये स्व.सौ. एस. के. सोमैया प्राथमिक विद्यामंदिर व बाल संस्कार केंद्र श्रीरामपूर, येथे 'पद्मश्री प्रतापराव गोविंदराव पवार न्यू एज स्किल सेंटर' (–ख. खेढ. ठेलेंौंळली) तसेच रा.ब. नारायणराव बोरावके महाविद्यालयात 'मुलींचे वसतिगृह व भोजन कक्ष आणि नूतन इमारतीचे भूमिपूजन' व सी. डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर येथील 'स्पर्धा परीक्षा अभ्यासिका' या विविध वास्तूंचे उद्घाटन व भूमिपूजन समारंभ बुधवार दिनांक २५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. सदर समारंभाचे उद्घाटक मान. पद्मश्री प्रतापराव गोविंदराव पवार, उद्योगपती, समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ आणि प्रमुख अतिथी चंद्रकांत दळवी, ख–ड(ठशींव.) चेअरमन, रयत शिक्षण संस्था सातारा, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे. सदर समारंभासाठी मीनाताई जगधने, सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल रयत शिक्षण संस्था सातारा व प्रमुख, रयत शैक्षणिक संकुल श्रीरामपूर आणि मान. प्रकाश निकम पाटील सदस्य, जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था सातारा यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

अशी माहिती प्राचार्य, प्रो.डॉ.प्रवीण बडधे, प्राचार्य डॉ.संजय कांबळे, प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे, मुख्याध्यापक सोनाली पैठणे व सुनील साळवे यांनी दिली. सदर शैक्षणिक कार्यक्रमाला रयत शैक्षणिक संकुलातील सर्व सन्माननीय महाविद्यालय विकास समिती सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी व श्रीरामपूर तालुक्यातील ग्रामस्थ यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

## विखे पाटील तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांचा नर्चरिंग ब्रिलियन्स शिष्यवृत्तीने गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील तंत्रनिकेतन मधील विद्यार्थ्यांसाठी कमिन्स इंडिया फाउंडेशन तर्फे नर्चरिंग ब्रिलियन्स शिष्यवृत्ती योजना जाहीर करण्यात आली आहे. अशी माहिती प्राचार्य डॉ.व्हि. आर राठी यांनी दिली. या योजनेअंतर्गत रासायनिक अभियांत्रिकी विभागातील द्वितीय वर्षाचा विद्यार्थी प्रवीण घोरपडे याची निवड करण्यात आली.

गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत असून, निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्चासाठी आर्थिक मदत, करिअर मार्गदर्शन आणि कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमी असलेल्या आणि शैक्षणिक प्रगतीत प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा लाभहोणार आहे. ही शिष्यवृत्ती प्रामुख्याने पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षाच्या डिप्लोमा अथवा पदवी विद्यार्थ्यांसाठी दिली जाते.

या शिष्यवृत्तीअंतर्गत विद्यार्थ्यांना संपूर्ण शिक्षण शुल्काचा खर्च, इतर शैक्षणिक खर्चासाठी आर्थिक सहाय्य, निवडक विद्यार्थ्यांना लॅपटॉप, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन तसेच व्यक्तिमत्व व करिअर विकासासाठी विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. तंत्रनिकेतनाचे प्राचार्य डॉ. विजय कुमार राठी यांनी या उपक्रमाचे स्वागत करताना सांगितले की, अशा प्रकारच्या शिष्यवृत्ती योजनांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांना उच्च शिक्षणासाठी प्रेरणा मिळते. तसेच उद्योग क्षेत्राशी विद्यार्थ्यांचा संपर्क प्रस्थापित होण्यास मदत होते. कमिन्स इंडिया फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत उद्योग क्षेत्रातील संधी, आवश्यक कौशल्ये आणि करिअर नियोजनाबाबत मार्गदर्शन केले.

## श्रीराम साधना आश्रमात पंचदिनात्मक श्रीराम जन्मोत्सवास प्रारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील मुकिंदपूर चारी क्रमांक तीन जवळील रामनगर येथील श्रीराम साधना आश्रमात पंचदिनात्मक श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यास श्रीराम यज्ञाने भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. प्रमुख महंत स्वामी सुनीलगिरी महाराज व भागवताचार्य साध्वी सुवर्णानंद चैतन्य यांच्या उपस्थितीत प्रभू श्रीरामचंद्रांच्या मूर्ती व होमकुंडाचे पूजन करून सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. सोमवारी (दि. २३ मार्च) दहा यजमानांच्या हस्ते श्रीराम मंदिरातील बारा ज्योतिर्लिंग व प्रभू श्रीराम मूर्तीचे पूजन करण्यात आले. जय श्रीराम च्या गजरात दीपप्रज्वलन व होमकुंड प्रज्वलित करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. या निमित्ताने २३ ते २७ मार्चदरम्यान दररोज सायंकाळी कीर्तन महोत्सव, श्रीराम महायज्ञ व अभिषेक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. २५ मार्च रोजी भास्करगिरी महाराज यांचे प्रवचन, तर २६ मार्च रोजी रामनवमी निमित्त मुख्य जन्मोत्सव परमहंस मुक्तानंद महाराज यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. २७ मार्च रोजी साध्वी सुवर्णानंद चैतन्य यांच्या काल्याच्या कीर्तनाने सोहळ्याची सांगता होऊन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की जुबेर मजीद खान हे दिनांक ०३/०९/२०२२ रोजी मेडिकव्हर हॉस्पीटल येथे मयत झालेले आहेत

त्याची कायदेशीर वारस पत्नी कौसर जुबेर खान हेच त्यांना वारस असून त्यांनी दाखवलेल्या कागदपत्र व दिलेल्या माहितीवरून मयत जुबेर मजीद खान यांच्या नावे असलेली फोर्स कंपनी ची ट्रॅव्हलर इड खखख असून तिचा रजिस्ट्रेशन क्रमांक – MH19 AQ 7884

चेसीस क्रमांक – MC1E4DKA2AP000674, इंजिन क्रमांक – D18029497 असे आहे. सदर गाडी मयताचे वारस पत्नी कौसर जुबेर खान च्या नावावर करणे करिता १८/०३/२०२६ रोजी संमतीपत्र लिहून व नोंदवून दिलेले आहेत. त्यामुळे मयत जुबेर मजीद खान यांच्या नावावर असलेली नमूद गाडी वारस हक्काने त्यांच्या पत्नी कौसर जुबेर खान यांचे नावावर करण्यास कोणाची ही काही हरकत असल्यास नोटीस ची प्रसिद्धी दिनांक पासून ७ दिवसाच्या आत त्याची लेखी हरकत आमच्या कडे नोंदवावी त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही कळावे,

**अ‍ॅड. सुनील अ. शेळके**
**नोटरी पब्लिक भारत सरकार**
**वॉर्ड नं ७ बेलापूर रोड श्रीरामपूर**

### जाहीर समन्स

अ‍ॅड. पल्लवी शरदराव कांबळे
राहुरी, अहमदनगर
पु.ने.दि. २४/०४/२०२६

अहमदनगर येथील सिव्हील जज्ज साहेब, सिनियर डिव्हीजन यांचे कोर्टात..

एच.एम.पी. नंबर ३७४/२०२४

**अर्जदार** –सुनिल दिनकर गायकवाड

**सामनेवाले** – सोनाली सुनिल गायकवाड

ज्या अर्थी अर्जदाराने या न्यायालयाकडे अर्जदार व सामनेवाले यांचे दरम्यान झालेल्या विवाहाचे विच्छेदन होऊन मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी याद्वारे तुम्हांस कळविण्यात येते की, आपणास समन्स बजावणी होत नाही म्हणून अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे. त्यावरील आदेशान्वये जाहीर समन्स काढण्यात आलेले आहे. तुम्ही सदर अर्जाचेकामी तुमचे म्हणणे/कैफियत देणे कामी दि. २४/०४/२०२६ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता या न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. निर्दीष्ट केलेल्या दिनांकास किंवा तत्पुर्वी बजावणी करता पत्ता देण्यास कसूर केल्यास तुमचा बचाव मे. कोर्टात विचारात घेतला जाणार नाही व पुढील योग्य आदेश पारीत होईल याची नोंद घ्यावी.

दि.१८/०३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

अहमदनगर
ता. १८/०२/२०२६

**कामगिरी क्लार्क**
**कनिष्ठ लिपिक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर**
**अहमदनगर**

शिक्का

**हुकूमावरुन**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर**
**अहमदनगर**

# वरखेडच्या महालक्ष्मी मंदिरावर बोगस विश्वस्तांचा फलक; गावात तणावाचे वातावरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : तालुक्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या वरखेड येथील श्री महालक्ष्मी देवी मंदिराच्या दर्शनी भागावर बेकायदेशीररित्या विश्वस्त असल्याचा फलक लावण्यात आल्याने गावात संतापाचे व तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.या प्रकारामुळे मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्येही संभ्रम निर्माण झाला असून ग्रामस्थांनी व विश्वस्तांनी याप्रकरणी कठोर कारवाईची मागणी केली आहे.

वरखेड येथील श्री महालक्ष्मी देवीचे मंदिर हे महाराष्ट्रातील सर्वधर्मीय बांधवांचे श्रद्धास्थान असून पुरातन महिमा असलेले तीर्थक्षेत्र आहे. या मंदिराच्या व्यवस्थापनासाठी सन २४ मार्च १९९८ रोजी श्री महालक्ष्मी देवी मंदिर सार्वजनिक ट्रस्ट, वरखेड (नोंदणी क्र. ए–७२०) स्थापन करण्यात आले आहे. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या या ट्रस्टमार्फत मंदिराचा सर्व कारभार अधिकृत विश्वस्तांकडून चालविला जातो. मात्र काही असामाजिक प्रवृत्तीच्या व्यक्तींनी बाहेरगावातील गुंड प्रवृत्तीच्या लोकांना हाताशी धरून स्वतःला श्री महालक्ष्मी देवी देवस्थान ट्रस्ट क्षेत्र वरखेड चे संचालक मंडळ असल्याचा खोटा दावा करत मंदिराच्या दर्शनी भागावर जुन्या विश्वस्त मंडळाचा बोर्ड काढून रात्रीतून नवा फलक लावला आहे विशेष म्हणजे फलकावर सध्या अस्तित्वात असलेल्या विश्वस्त मंडळाचा नोंदणी क्रमांक टाकलेला आहे या फलकावर नोंदणीकृत संस्थेचा क्रमांक वापरून विश्वस्त असल्याचा भास निर्माण केल्याने भाविकांमध्ये गोंधळ उडाला आहे.

विशेष म्हणजे या फलकावर जे कोणी विश्वस्त असल्याचा दावा करीत फोटो लावलेले आहेत त्यापैकी अनेक जण वरखेड गावचे निवासी नाहीत. विश्वस्त मंडळाच्या म्हणण्यानुसार विजय शिरसाठ, अनिल माळी व सुरेश घुंगासे यांच्यासह काही जणांनी हा प्रकार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित काही व्यक्तींच्या नावावर विविध गुन्हे दाखल असून त्यांच्या कृतीमुळे गावात दहशतीचे वातावरण तयार झाले असल्याचे ही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे विश्वस्त मंडळाच्या जिवीतासही धोका निर्माण झाल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

या प्रकरणी श्री महालक्ष्मी देवी मंदिर सार्वजनिक ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी २२ मार्च रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार देत मंदिरावर लावलेला बोगस फलक तात्काळ हटवून संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्या निवेदन सर्वच विश्वस्तांच्या सहया आहेत.या प्रकारामुळे गावातील धार्मिक वातावरण बिघडण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक जन्म–मृत्यु एसआर–६५/२०२६
नेवासा दिनांक ०२/०३/२०२६

अर्जदार श्री/श्रीम–सोपान अर्जुन काळे, रा.तेलकुडगाव, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन कै.सविता अर्जुन काळे, यांचा महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू नोंद गावी जन्म–मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यू नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.–१, मृत्यु नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव–कै.सविता अर्जुन काळे, गावाचे नाव–तेलकुडगाव, मृत्यु दिनांक–२५/१०/२०१४ करिता या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म–मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू नोंद गावी जन्म–मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

शिक्का

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## पान १ वरुन

### ‘जननेंद्रियाचा त्याग मी स्वतःहून केला’

असल्याने डॉक्टरांनी पुढील आठवडाभर कोणत्याही भक्ताने गडावर भेट देऊ नये, असे कळकळीचे आवाहन केले आहे. प्रशासनानेही गडावर गर्दी टाळण्याचे आवाहन केले असून, महाराजांना पूर्ण विश्रांतीची गरज आहे.तारकेश्वर गड हे बीड जिल्ह्यातील (आष्टी तालुका) एक जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांनी गडाच्या विकासासाठी भक्तनिवास, गोशाळा, अन्नदान असे विविध उपक्रम राबवले आहेत. या घटनेमुळे भाविकांमध्ये चिंता निमर्ण झाली असली तरी महाराजांच्या या स्पष्ट वक्तव्याने भक्तांना दिलासा मिळाला आहे.

### पाणीपुरवठा निविदा प्रकरणात विरोधकांचा हल्लाबोल

३१ मार्चपर्यंत ५ हजार रुपयांत नियमित करण्याची संधी देण्यात आली. त्यानंतर २५ हजार दंड व पाणीचोरीचे गुन्हे दाखल होतील. जनजागृतीसाठी रिक्षा व कचरा गाड्यांवर सूचना देण्याचे ठरले. २१ एकर जागेवर म्हाडामार्फत ३२०० घरकुल योजना राबविण्याचा प्रस्ताव गाजला. म्हाडाने ३५०-४०० चौ.फु. घराची किंमत १५ लाख ठरविली आहे. ही किंमत जास्त असून ६-७ लाखांत घरे बांधावीत, असे मुजफ्फर शेख, दिलीप नागरे यांनी सुचवले. नगराध्यक्षांनी म्हाडातर्फेच योजना राबवावी, असे सांगितले. प्रधानमंत्री आवास योजनेच्या सबसिडीमुळे दर कमी होऊ शकतात. अंतर्गत गटारी योजनेचा फेरआढावा घेऊन अमृत योजनेतर्फे राबविण्याचा निर्णय झाला. ४९.३६ कोटींच्या या योजनेत महागाईमुळे ठेकेदाराने काम थांबवले आहे. नवीन एजन्सी नेमून काम पूर्ण करावे.कर्मवीर चौकातील उघड्यावर मटन-चिकन विक्री बंद करावी, मोरगे वस्तीतील रस्त्यांच्या पाट्या पुन्हा लावाव्यात, फ्लेक्स बोर्डसाठी ५ रुपये प्रति चौ.फु. दर, जैन स्थानक संघाच्या थकबाकी प्रकरणी मार्ग काढावा आदी विषयांवरही चर्चा झाली. सभेदरम्यान वीज पुरवठा अनेकदा खंडित झाला. जनरेटरमुळे व्यत्यय कमी झाला तरी ध्वनीक्षेपक यंत्रणेवर परिणाम झाला.

## गॅस मुबलक म्हणणाऱ्या सरकारवर प्रश्नचिन्ह; रांगांमुळे ठाकरे गट आक्रमक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पोहेगाव :** आखाती देशांतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात इंधन तुटवडा नसल्याचा दावा सरकार करत असताना कोपरगाव तालुक्यात गॅससाठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने प्रशासनाला धारेवर धरले आहे.शहराध्यक्ष पै. गगन हाडा यांनी तहसीलदारांना निवेदन देत, गॅस मुबलक असल्याचा दावा खरा असेल तर वितरकांसमोर गर्दी का? असा सवाल उपस्थित केला. महिनाभरापासून गॅस वितरण केंद्रांवर मोठी गर्दी होत असल्याचे त्यांनी नमूद केले. कृत्रिम टंचाई निर्माण करून ग्राहकांचे शोषण होत असल्याची शक्यता व्यक्त करत संबंधितांवर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा गॅस टंचाईविरोधात मोठे आंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला.या वेळी निखिल कंक्राळे, वैभव शेलार, राहुल हाडा यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

## भारतरत्न मदर तेरेसा इंग्रजी शाळेत रमजान ईद सण उत्साहात साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** शहरातील भारतरत्न मदर तेरेसा इंग्रजी शाळेत रमजान ईद सण उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरवातीला शाळेतील विद्यार्थ्यांनी सुंदर असे नृत्य सादर केले.अलिजा शेख व जयान पटेल या विद्यार्थ्यांनी रमजान ईद सणाचे महत्त्व व त्यातून जपली जाणारी बंधुता या विषयावर आपले मनोगत व्यक्त केलेतसेच उजेर मुर्तुजा, अब्दुल रहेमान बिनमाझी व सायबा चाऊस या विद्यार्थ्यांनी पवित्र कुराण मधील संदेशाचे वाचन केले.कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे व्यवस्थापक फादर विल्फ्रेड सल्ढाना यांनी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांना ईद सणाच्या शुभेच्छा देत; रमजान ईद या सणातून जपली जाणारी बंधुता व सामाजिक ऐक्य याबाबत आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन झेबा चाऊस, प्रणाली राजपूत, आलिया पठाण व अनया तुमराम यांनी केले.यावेळी सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



# पुणे-नाशिक महामार्गावर भीषण अपघात

### एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू , दोन मुले गंभीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** पुणे-नाशिक महामार्गावर मंचरजवळील एकलहरे गावच्या हद्दीत रविवारी रात्री साडे अकरा वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील पती, पत्नी आणि सासू अशा तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघातात दोन मुले गंभीर जखमी झाली आहेत.





मंचर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मल्लिकार्जुन शिवराम आंबेगावे (रा. पिंपरी, पुणे) हे आपल्या कुटुंबासह नाशिकहून पुण्याकडे कारने येत होते. एकलहरे गावाजवळ कारचा ताबा सुटल्याने ती डिव्हायडर तोडून समोरून येणाऱ्या बसला धडकली. या भीषण धडकेत चालक मल्लिकार्जुन शिवराज आंबेगावे (वय ४६), त्यांची पत्नी आरती मल्लिकार्जुन आंबेगावे (वय ४२) आणि सासू लता बाळू तूपलोंढे (वय ६३) यांचा जागीच मृत्यू झाला. तर मुलगा प्रेम मल्लिकार्जुन आंबेगावे (वय २०) आणि मुलगी मृणाल मल्लिकार्जुन आंबेगावे (वय १६) ही दोन्ही मुले जखमी झाली असून त्यांच्यावर मंचर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातात कारचा अक्षरशः चक्काचूर झाला असून दोन्ही टायर फुटल्याचेही समोर आले आहे. बसच्या पुढील बाजूचे भागाचे नुकसान झाले आहे. अपघाताचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी मागून आलेल्या वाहनाने हूल दिल्याने किंवा टायर फुटल्याने, वाहनावरील नियंत्रण सुटल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, मंचर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून अपघात कशामुळे झाला याचा पुढील तपास सुरू आहे. मृतदेहांचे शवविच्छेदन करून ते नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आल्याचे सांगण्यात आले. तसेच या गाडीमधून धूर येत असल्याने तेथील व्यक्तींनी बॅटरीच्या वायर बाजूला केल्या व तत्काळ मदत मिळावी म्हणून रुग्णवाहिकेला फोन केला. अपघातानंतर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

# खरात प्रकरणावर युवासेनेचा निषेध

### एकट्या चाकणकरांवर कारवाई का ?: रेवणनाथ गायकवाड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** - कथित भोंदू बाबा कॅप्टन अशोक खरात प्रकरणावर युवासेना (उ.बा.ठा) पुणे उपजिल्हाप्रमुख रेवणनाथ शांताराम गायकवाड यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. संबंधित आरोपीने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप गंभीर व निंदनीय असल्याचे सांगत त्याला कठोरात कठोर शिक्षा,अगदी फाशीची शिक्षा व्हावी,अशी मागणी त्यांनी केली.

याचवेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर एकट्यांवरच कारवाई होत असल्याबद्दल गायकवाड यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या प्रकरणात अनेक मंत्री, खासदार, आमदार आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचे फोटो समोर आले आहेत. मग फक्त चाकणकरांनाच लक्ष्य का केले जात आहे ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

गायकवाड यांनी पुढे म्हटले की, देशाचे गृहमंत्री अमित शाह, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच सुनील तटकरे,दिपक केसरकर, राधाकृष्ण विखे पाटील, चंद्रकांत पाटील, जयंत पाटील, निलेश लंके, श्रीकांत शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांचे फोटो या प्रकरणाशी संबंधित म्हणून समोर आले असतील, तर नैतिकतेच्या आधारावर सर्वांवर समान निकष लावले जावेत.जर चाकणकरांचा राजीनामा घेतला गेला असेल, तर ज्या-ज्या लोकांचे आरोपीसोबत फोटो आहेत, त्या सर्वांनीही नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामे द्यावेत व त्यांच्यावरही चौकशी व्हावी, अशी मागणी गायकवाड यांनी केली. तसेच काही महिला पदाधिकारी वैयक्तिक स्वार्थातून पातळी सोडून टीका करत असल्याचा आरोप करत त्यांनी अशा प्रवृत्तींचा ही निषेध केला. दरम्यान, या प्रकरणामुळे राज्यभरात संतापाची लाट उसळली असून संबंधित आरोपीवर कडक कारवाई करण्याबरोबरच सर्व संबंधितांची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## निधन वार्ता

### भिमाबाई फटांगरे



**गोंडेगाव :** येथिल भिमाबाई रावसाहेब फटांगरे वय (६६) यांचे दुःखत निधन झाले. त्यांच्या पश्च्यात तिन मुले, तिन भाया, पुतने, पुतनी, नात, नातू असा मोठा परिवार असून अहिल्यानगर व चेन्नई येथिल प्रसिद्ध कंपनी एल अ‍ॅन्ड टीचे सबव्हेंडर अष्टविनायक इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीजचे मालक होत्या. त्या अहिल्यानगर येथिल प्रसिद्ध उद्योजक राहुल फटांगरे व प्रगतशिल शेतकरी संदीप फटांगरे तसेच पुणे येथील उद्योजक शरद फटांगरे यांच्या मातोश्री होत.

## सीएनजीच्या कामांना प्राधान्य एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या सूचना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** देशभरातील सीएनजी प्रकल्पांशी संबंधित कामांना प्राधान्याने गती देण्याच्या सूचना केंद्र सरकारकडून देण्यात आल्या आहेत. यासोबतच एलपीजी (ङझॠ) पुरवठ्यात उद्भवणाऱ्या अडचणी दूर करून नागरिकांना अखंडित सेवा देण्यावरही भर देण्यात आला आहे. अशी माहिती भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि पेट्रोल डीलर असोशीएशनचे राष्ट्रीय सदस्य अली दारूवाला यांनी दिली. केंद्र सरकारच्या संबंधित विभागाकडून राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना पाठवलेल्या पत्रामध्ये सी एन जी पायाभूत सुविधा उभारणीतील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामध्ये पाइपलाइन टाकणे, परवानग्या, रस्ते खोदकाम मंजुरी आणि विविध विभागांमधील समन्वय यावर विशेष लक्ष देण्यास सांगितले आहे. तसेच, एलपीजी पुरवठ्याबाबत काही भागांत निर्माण होणाऱ्या अडचणींचा आढावा घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वितरण व्यवस्थेत सुधारणा करून ग्रामीण व शहरी भागांमध्ये गॅस उपलब्धता सुरळीत ठेवण्याचे उद्दिष्ट आहे.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून नागरिकांना सुरक्षित, परवडणारी आणि अखंडित ऊर्जा सेवा उपलब्ध करून द्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**आपत्कालीन सेवा असताना गॅस पाईप लाइन रखडलेली :**

पुणे, पिंपरी - चिंचवड शहरात काही सोसायटयांना थेट पाईप लाईनद्वरे गॅस पुरवठा केला जातो. शहरात महानगर गॅस लिमिटेडने यासाठी पुढाकार घेतला आहे. हडपसर भागात पाईप लाइन द्वरे गॅस पुरवठा करण्यात येणार आहे, मात्र पुलगेट येथे सायकल ट्रॅक खोदायचा की नाही या वादात सदरील काम रखडले आहे. हा प्रश्न सुटला तर ९ लाख नागरिकांना आणि २५ हजार रिक्षा चालकांना गॅस मिळणार आहे. महानगर गॅस लि. कंपनी महापालिकेकडे पैसे भरायला तयार आहे, मात्र पालिका प्रशासन दाद देत नाही, तसेच महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे पाठपुरावा करूनही प्रश्न सुटला नाही. आज गॅस पुरवठा करण्यास अडथळे आले तर एस्मा कायदा लागू करण्यात आला आहे. यामुळे महापालिकेने तत्काल मार्ग काढावा अशी मागणी अली दारूवाला यांनी केली आहे.

## गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर कादवे येथे २६ आदिवासी घरांची पायाभरणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कादवे (ता. राजगड), :** राजगड तालुक्यातील कादवे येथे गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर २६ आदिवासी घरांच्या पायाभरणीचा भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला. या उपक्रमातून आदिवासी कुटुंबांना पक्के निवासस्थान उपलब्ध करून देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले.तालुक्यातील एकूण १२३ आदिवासी कुटुंबांपैकी मंजूर २६ घरांच्या बांधकामाचा शुभारंभ गुरुवार, सकाळी ११ वाजता करण्यात आला. कार्यक्रमास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे जिल्हा परिषद प्रकल्प संचालक शालिनी कडू, जिल्हा परिषद सदस्य अमोल नलावडे, पंचायत समिती सभापती सुवर्णा राऊत, उपसभापती संदीप खुटवड, सदस्य सीता खुळे, किरण राऊत, गटविकास अधिकारी संजय धमाळ यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य व लाभार्थी उपस्थित होते.या योजनेमुळे आदिवासी समाजाच्या राहणीमानात सुधारणा होऊन सुरक्षित व सन्मानाचे निवासस्थान मिळेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

आदिवासी बांधवांना हक्काचे घर मिळणे ही सामाजिक न्यायाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे, असे शालिनी कडू यांनी सांगितले.

# रांजणी येथे रोजगार मेळावा टाटा मोटर्सकडून ५५ युवकांना जागेवर नियुक्तीपत्र

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी रांजणी ( ता . आंबेगाव ) येथे शनिवार, ( दि. २१) मार्च रोजी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. पंचायत समिती सदस्या प्रियांका केतन वाघ आणि केतन वाघ यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला होता.

या मेळाव्यात देशातील अग्रगण्य वाहननिर्मिती कंपनी टाटा मोटर्स सहभागी झाली होती. कंपनीकडून अरविंद काळे, गोवर्धन पांचाळ तसेच त्यांच्या सहकाऱ्यांचे मुलाखत पथक उपस्थित राहून उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात आली. या रोजगार मेळाव्यास सुमारे २५० हून अधिक युवक-युवतींनी नोंदणी केली होती. त्यापैकी ५५ पात्र उमेदवारांची निवड करून त्यांना टाटा मोटर्सकडून जागेवरच नियुक्तीपत्र (जॉइनिंग लेटर) देण्यात आले. त्यामुळे अनेक युवकांच्या रोजगाराचा मार्ग मोकळा झाला आहे.




रांजणी व परिसरातील पंचक्रोशीत प्रथमच अशा प्रकारचा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आल्याने स्थानिक युवकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांच्या हस्ते झाले. यावेळी तालुका अध्यक्ष धोंडीभाऊ भोर, शिवसेना तालुका अध्यक्ष प्रवीण थोरात, जिल्हा परिषद सदस्या प्रीती थोरात, तालुका कार्याध्यक्ष गणेश यादव यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष केतन वाघ यांनी उपस्थित मान्यवर, टाटा मोटर्सचे अधिकारी तसेच सहभागी युवक-युवती यांचे आभार मानले.

# गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर केरोसीन वितरणाची मागणी तीव्र

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यात घरगुती गॅसचा तुटवडा तीव्र होत असून ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. कवठे येमाईसारख्या मोठ्या गावातही गॅस उपलब्धतेचा प्रश्न गंभीर बनला असून अनेक ठिकाणी गृहिणींना पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे. काही नागरिकांनी अडगळीत पडलेले स्टोव्ह व लाकडांचा वापर सुरू केला आहे.



या पार्श्वभूमीवर शिधापत्रिका धारकांना रास्त भाव दुकानामार्फत केरोसीन (रॉकेल) पुन्हा उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे. स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ वचकल यांनी शासनाकडे प्रती कुटुंब किमान ४ लिटर केरोसीन सवलतीच्या दरात तात्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

कवठे येमाई परिसरातील अनेक लाभार्थ्यांनी केरोसीनचा स्वयंपाकासाठी पर्याय म्हणून स्वीकार करण्याची तयारी दर्शविली आहे. संघटनेचे तालुका अध्यक्ष गणेशराव रत्नपारखी यांनी सांगितले की, लाभार्थ्यांशी चर्चेनंतर केरोसीन हा सध्याच्या परिस्थितीत आवश्यक पर्याय ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, केरोसीनवर चालणारी उपकरणे सध्या बाजारात मर्यादित प्रमाणात उपलब्ध असली तरी मागणी वाढल्यास ती उपलब्ध करून देण्याची तयारी स्थानिक व्यापाऱ्यांनी दर्शविली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी शासनाने तात्काळ निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


## नावात बदल

माझे जुने नाव कोल्हे अजय दत्तात्रय (शाळा सोडल्याचा दाखला वरील नाव) असे असून माझे नवे नाव अजय दत्तात्रय कोल्हे ( आधार कार्ड वरील नाव )असे आहे पत्ता देर्डे -कोऱ्हाळे तालुका कोपरगाव जिल्हा अहमदनगर. दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असून अन्य दुसरी व्यक्ती नाही प्रतिज्ञापत्र क्र.२५५२२४२०३१२६८१००६०२८५७ दिनांक २३/०३/२०२६

## CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAMEDEEPAK GORAKSHA SHIRASATH ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS DEEPAK GORAKSHANATH SHIRSATH (AADHAR NO. 2168 1498 0334) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC KOLHAR PLACE: KOLHARDATE : 23/03/2026

## Change of name

My name is Rambhau Dhondiba Kanade as per record. Due to spelling mistake it is appeared on passport as Ramhbau Dhondiba Kanade. Correct name is Rambhau Dhondiba Kanade. Aadhar No is 408142229027 as proof


## नशिबाची परिक्षा

**मंगळवार दि .२४ मार्च २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२८ ३८० ३३५ | १-० | १९० २८० २४ | जोड ०२-१८-४०-३५-६९ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४९ २४८ २२० | ४-६ | १५० १६९ ११४ | जोड ४१-०६-९२ ७८-६५ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १८० २८० ३८८ | ९-२ | १५६ २४६ ६६० | जोड ९७-४२-१३ ८०-२५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | | | |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

# अहिल्यानगर संघाचे पिंच्याक सिलॅट स्पर्धेत घवघवीत यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** पिंच्याक सिलॅट लीग महाराष्ट्र स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हा संघाने उल्लेखनीय कामगिरी करत ८ सुवर्ण, ९ रजत व ८ कांस्य पदके पटकावत चौथ्या क्रमांकावर आपले स्थान निश्चित केले. ही राज्यस्तरीय स्पर्धा २१ ते २२ मार्च २०२६ दरम्यान तपोवन, नाशिक येथील सर्वेश्वर महादेव ट्रस्टच्या इनडोअर हॉलमध्ये पार पडली.




स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया (साई) यांच्या मान्यतेने व इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशनतर्फे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील २२ जिल्ह्यांमधून सुमारे ८०० महिला खेळाडूंनी विविध गटांमध्ये सहभाग नोंदविला. खेळाडूंसाठी निवास व अन्य सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

अहिल्यानगर येथील ३३ महिला खेळाडूंनी स्पर्धेत भाग घेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. पिंच्याक सिलॅट हा इंडोनेशियन मार्शल आर्ट प्रकार असून टंडिंग (फाईट), तुंगल (सिंगल काता), रेगु (ग्रुप काता), गांडा (डेमी फाईट) व सोलो अशा विविध प्रकारांमध्ये सामने खेळविण्यात आले.

या खेळाचा समावेश सप्टेंबर २०२० पासून केंद्र सरकारच्या क्रीडा मंत्रालयाने ५ टक्के राखीव नोकरी भरतीत केला असून, त्यामुळे खेळाडूंना करिअरच्या दृष्टीने नवी संधी उपलब्ध झाली आहे. पिंच्याक सिलॅटला युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय, भारतीय विद्यापीठ संघटना तसेच ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशियाची मान्यता असून हा खेळ एशियन गेम्ससह विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये खेळला जातो.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी आमदार सौ. देवयानी फरांदे, इंडियन फेडरेशनचे अध्यक्ष किशोर येवले, पोलीस उपनिरीक्षक सचिन घावटे यांसह विविध मान्यवर उपस्थित होते.

या यशासाठी खेळाडूंना अहिल्यानगर जिल्हा पिंच्याक सिलॅट असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण कुदळे, राष्ट्रीय पंच नरेंद्र कुदळे, शशिकांत नवगिरे व सौ. नवगिरे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच महिला प्रशिक्षक म्हणून सौ. समीरा व कोमल वढणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## द•ख•ल



### पशुपक्षी प्रदर्शनामध्ये आव्हाण्याचा भुंगा डॉन बैल प्रथम

**ढोरजळगांव :** वाघोली ता. शेवगाव येथे पार पडलेल्या जिल्हा परिषद अहिल्यानगर पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती शेवगाव यांचे विद्यमाने तालुकास्तरीय पशुपक्षी प्रदर्शनामध्ये आव्हाने येथील शरद वाणी यांच्या भुंगा डॉन या बैलाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. यावेळी शरद वाणी यांना आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचे पारितोषिक व सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आले. वाणी कुटुंब गेल्या अनेक वर्षांपासून बैलगाडा क्षेत्रात त्यांचे मोठे नाव या पंचक्रोशीमध्ये गाजत आहे गेल्या वर्षी सुद्धा त्यांनी पिस्तूल नावाचा बैल याची नऊ लाख ५१ हजार ला विक्रमी विक्री केली होती बैलगाडा क्षेत्रात आव्हाने गावाचं नाव त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये गाजवलं वाघोली येथे देखील त्यांच्या बैलाने बक्षीस मिळवत आव्हाने पंचक्रोशीत नावलौकिक मिळवला आहे त्याबद्दल त्यांचे आव्हाणे बु पंचक्रोशीतून कौतुक होत आहे.

### सक्षम निर्णय, सकारात्मक विचार व धाडसी कर्तव्य यशाची त्रिसूत्री-दत्तात्रय वारकड



**अहिल्यानगर :** जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलीस मुख्यालय, अहिल्या नगर येथे आनंदी जीवन आयुष्याचा आनंद उत्सव या व्यक्तिमत्व विकास विषयावरील विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात लेखक व प्रेरणादायी वक्ते श्री दत्तात्रय वारकड यांनी उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी पीआय श्री उमेश परदेशी, राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री विजय भोसले तसेच विविध पोलीस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचारी, आरसीएफ फोर्स व क्यूआरटी फोर्समधील पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी त्यांनी उपस्थितांना नियमित ध्यान करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री विजय भोसले यांनी श्री दत्तात्रय वारकड यांचा सन्मान करून उपस्थित सर्व पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि प्रसारमाध्यम प्रतिनिधींचे आभार मानले.

### 'पुष्पगुच्छ नको, वृक्ष द्या'; पिंपरकणेत न्यायाधीशांचा साद



**अहिल्यानगर :** कोरोनाच्या भीषण काळात आपण सर्वांनी ऑक्सिजनचे महत्त्व रक्ताच्या नात्याने अनुभवले आहे. जर पुढील पिढीला शुद्ध श्वास द्यायचा असेल, तर आज केवळ झाडे लावून चालणार नाही, तर ती पोटच्या मुलाप्रमाणे जगवावी लागतील. इथून पुढे लग्न समारंभ किंवा वाढदिवसाला पाहुण्यांना फुलांचे गुच्छ देण्याऐवजी 'जिवंत झाड' भेट देऊन त्याचे जतन करण्याची संस्कृती रुजवा, असे आवाहन दिवाणी न्यायाधीश मा. एस. यु. न्याहारकर यांनी केले. पिंपरकणे (ता. अकोले) येथे निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित एक दिवसीय कार्यशाळा व अभ्यास दौऱ्याच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. .या कार्यक्रमाला कार्याध्यक्षा छायाताई राजपूत, निर्मला म्हस्के,लतिका पवार, अनिल लोखंडे, संजय गायकवाड, रामनाथ भोजने, बाळासाहेब डोंगरे, नानासाहेब गोफने, चंद्रकांत भोजने, बाळासाहेब ढोले, मुख्याध्यापक विलास सावंत,प्राचार्य संजय कडलक,शोभा काळे, रफिक कादरी,पत्रकार शांताराम काळे, संजय देशमुख यांसह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक विलास सावंत यांनी केले. सूत्रसंचालन प्रसिद्धीप्रमुख महेश पाडेकर यांनी, तर आभार प्रदर्शन चंद्रशेखर हासे यांनी मानले.

### प्रभाग क्र.२ मध्ये रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहराचा विकास कामांच्या माध्यमातून कायापालट करण्यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून विविध विकास कामांसाठी मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून नियोजनबद्ध व दर्जेदार विकास कामांमुळे शहर विकासाला गती मिळाली आहे. पूर्वी शहराला 'खेडे' म्हणून संबोधले जात होते, मात्र आता नागरिकच शहराचा उल्लेख विकसित शहर म्हणून करू लागले आहेत. सर्वांच्या सहकार्यामुळेच विकासाचे मोठे प्रकल्प मार्गी लागत असून निर्मल नगर हा शहराचा शेवटचा भाग असतानाही या परिसरातील मूलभूत प्रश्नांपासून सर्वच विकास कामे मार्गी लावण्यात आली आहेत. जमिनीखालील कामे पूर्ण केल्यानंतरच रस्ता कॉंक्रिटीकरणाची कामे हाती घेतली असून त्यामुळे ही कामे टिकाऊ राहतील व पुन्हा पुन्हा दुरुस्तीची गरज भासणार नाही. पुढील अनेक वर्षांचा विचार करून शहरामध्ये विकास कामे सुरू असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

# श्रीगोंद्यात 'स्मार्ट' फसवणूक!

## पतसंस्थांना महिलांच्या टोळीचा गंडा; कर्ज गेले, वसुली गायब

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात सध्या पतसंस्थांच्या डोक्यावर नवीनच संकट उभं ठाकलं आहे. महिलांची एक संगनमताने काम करणारी टोळी विविध पतसंस्थांना गंडा घालत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येत आहे. सभासद कर्ज घ्या आणि गायब व्हा असा जणू नवा फॉर्म्युलाच या टोळीने राबवला असल्याची चर्चा आर्थिक वर्तुळात रंगली आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील विविध पतसंस्था ला चक्क महिलांनी गंडा घातल्याचे निदर्शनास आले असून यासाठी श्रीगोंदा फॅक्टरी परिसरातील काही महिला मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत या टोळीतील महिला विविध नावांनी आणि कागदपत्रांच्या आधारे पतसंस्थांमध्ये सभासदत्व घेतात. विश्वास संपादन करून कर्ज उचलले जाते. मात्र, कर्ज मिळाल्यानंतर वसुलीच्या वेळी या महिला संपर्काबाहेर जातात. परिणामी, पतसंस्थांची वसुली अक्षरशः 'शून्य' पातळीवर आली आहे. त्यामुळेच पतसंस्थांचा ताण वाढतच चालला आहे या फसवणुकीमुळे अनेक पतसंस्था आर्थिक अडचणीत सापडल्या आहेत. कर्ज दिलं, पण परतावा नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. काही संस्थांनी तर यामुळे अंतर्गत आर्थिक संतुलन बिघडल्याची कबुली दिली आहे.यामुळे अनेक पतसंस्थांच्या कायदेशीर हालचाली सुरू झाल्या आहेत या पार्श्वभूमीवर अनेक पतसंस्थांनी कलम १०१ अंतर्गत वसुलीसाठी सहाय्यक निबंधक कार्यालयाकडे धाव घेतली आहे. संबंधित महिलांविरोधात कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू असून, प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता प्रशासनानेही लक्ष केंद्रीत केलं आहे.इतर पतसंस्थांनीही सतर्क राहण्याची गरज आहे. आधी खात्री, मगच कर्ज ही जुनी म्हण आता पुन्हा एकदा सिद्ध होताना दिसतेय.

**तज्ज्ञांचे मत**

आर्थिक क्षेत्रातील जाणकार सांगतात फक्त कागदपत्रांवर विसंबून कर्ज देणं म्हणजे स्वतःच संकट ओढवून घेणं. तपासणी, पडताळणी आणि फॉलोअप हे तिन्ही टप्पे मजबूत असणं अत्यावश्यक आहे.

## शाळा ही ग्रामविकासाचा केंद्रबिंदू : काळे



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :** गावातील जिल्हा परिषद शाळेचा सर्वांगीण विकास आज त्या गावाच्या सर्वांगीण विकासाचा केंद्रबिंदू असल्याचे प्रतिपादन तेलकुडगाव चे सरपंच सतीश काळे यांनी केले.

तेलकुडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नव्याने रुजू झालेले मुख्याध्यापक अंबादास बोरुडे यांचे ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करण्यात आले यावेळी बोलताना काळे म्हणाले की, ग्रामपंचायत च्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी शाळेतील विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा व ऑनलाइन शिक्षण मिळण्यासाठी एक लाख रुपये किमतीचे एलईडी स्क्रीन, विद्यार्थ्यांना जेवणासाठी स्वतंत्र चार लाख रुपये किमतीचे किचन शेड, जिल्हा परिषद अध्यक्ष राजश्री घुले यांच्या माध्यमातून शाळा खोल्यांसाठी २९ लाख रुपये, शौचालयासाठी चार लाख रुपये, तसेच पेविंग ब्लॉक असा मोठा निधी देण्यात आला असून त्या माध्यमातून शाळेचा सर्वांगीण विकास झाला आहे. शाळेसाठी गुणवंत मुख्याध्यापक लाभल्याने त्याचा नक्कीच शाळेसाठी फायदा होणार असल्याचे त्यांनी म्हटले. यावेळी विद्यार्थ्यांनी ढोल व लेझीम पथकाने मुख्याध्यापकांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विलासराव घाडगे हे तर प्रमुख पाहुणे म्हणून रमेश देशमुख ,अनिल राजहंस, ह भ प महेश महाराज घाडगे, रवी काळे, शिवाजीराव घोडेचोर, सचिन घोडेचोर, संजय घोडेचोर, राजू घाडगे, श्रीकृष्ण घाडगे, श्रीकांत घाडगे, सुधाकर माने, महेश शेटे, अभिजीत घोडेचोर, शिक्षक चंद्रकांत देवढे, बाळासाहेब उभेदळ, वैशाली भोगे, जनाबाई काळे आदी.उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन संतोष लोणारे यांनी केले.

## श्रीगोंद्यात अखेर २७ मार्च रोजी जागतिक ग्राहक दिन साजरा होणार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** १५ मार्च रोजी होणारा जागतिक ग्राहक दिन श्रीगोंदा येथे तहसील प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रखडल्याने अखेर हा कार्यक्रम शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ रोजी दुपारी ३ वाजता तहसील कार्यालयात आयोजित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

तहसीलदार व पुरवठा अधिकाऱ्यांच्या मनमानी, बेजबाबदार व वेळकाढूपणाच्या भूमिकेमुळे कार्यक्रम रखडल्याचा आरोप करत अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत जाब विचारला. यानंतर प्रशासनाने तातडीने दखल घेत कार्यक्रम निश्चित केल्याचे सांगण्यात येत आहे.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा सहसचिव जितेंद्र पितळे व तालुकाध्यक्ष अनंता पवार यांनी सांगितले की, शासनाच्या आदेशानुसार दरवर्षी २४ डिसेंबर (राष्ट्रीय ग्राहक दिन) व १५ मार्च (जागतिक ग्राहक दिन) साजरे करणे बंधनकारक आहे. मात्र, श्रीगोंदा येथे हे दिवस केवळ औपचारिकतेपुरते साजरे केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

ग्राहक पंचायत पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, या कार्यक्रमाला संबंधित विभागांचे अधिकारी अनुपस्थित राहिल्यास कार्यक्रमाचा बहिष्कार टाकण्यात येईल. तसेच निषेध नोंदवून कार्यक्रम न करता निघून जाण्याची आक्रमक भूमिका त्यांनी मांडली.

अधिकाऱ्यांनी कामात कुचराई केल्यास थेट मंत्रालय स्तरावर तक्रार करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

या वेळी गणेश गडदे, शिवाजी साळुंखे, संतोष जठार, सुरेश दांडेकर, रामदास कुसाळकर, माऊली वाडगे, मदन गडदे, संतोष रोडे, प्रमोद पवार, अजित पटवा, दत्तात्रय हिरडे, गणेश लाढाणे आदी उपस्थित होते.



## आव्हाणे बु.शाळेत टाकाऊ पासून टिकाऊ उपक्रम

### केंद्रांतर्गत आव्हाणे गावठाण, दिंडेवाडी तागडवस्ती गणेशवाडी शाळेचा सहभाग

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :** मुख्यमंत्री पंचायतराज अभियान अंतर्गत आव्हाने बुद्रुक येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आव्हाणे बुद्रुक गणेशवाडी तागड वस्ती दिंडेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू त्याचबरोबर वेगवेगळ्या प्रकारच्या कला कौशल्य विकास क्रीडा वकृत्व रांगोळी या स्पर्धेचे आयोजन केले होते नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणून या स्पर्धेमध्ये सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला.

यामध्ये फुलांपासून वेगवेगळ्या प्रकारचे गुच्छ करणे टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तु तयार करणे वेगवेगळ्या प्रकारच्या रांगोळी स्पर्धा क्रीडा स्पर्धा यामध्ये विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली आहे माजी वसुंधरा अभियान अंतर्गत आव्हाने बुद्रुक गावाला नाशिक विभागामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.आव्हाने बुद्रुक ग्रामपंचायतचे मार्गदर्शक संजय कोळगे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याचबरोबर सरपंच उपसरपंच सर्व सदस्य ग्राम पंचायतचे सर्व कर्मचारी अहोरात्र परिश्रम घेत आहेत.

या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी दिर्डेवाडी, तागडवस्ती व आव्हाणे बु गावठाण जि प प्रा.शाळेचे अमोल शेवाळे,श्रीकांत मुरदारे श्रीम.माया बागडे, निर्मला खोसे,श्रीम निता नांगरे ,रामेश्वर जाधव, श्रीम विजया खाटीक विजया, पोपट भवार, श्रीम संगीता शेरकर ,श्रीम वंदना तिखे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## उत्कृष्ट लेखापरीक्षक संतोष तरटे यांचा पुन्हा राज्यस्तरीय गौरव; सलग दुसऱ्यांदा यशाची नोंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील कर्तव्यदक्ष व प्रामाणिक लेखापरीक्षक म्हणून ओळख असलेले संतोष तरटे यांनी आपल्या उत्कृष्ट कार्याच्या जोरावर पुन्हा एकदा राज्यस्तरीय सन्मान पटकावला आहे. सहकार आयुक्त तथा निबंधक यांच्या हस्ते त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विशेष म्हणजे, मागील वर्षी राज्यात प्रथम क्रमांक मिळविल्यानंतर यंदाही सलग दुसऱ्यांदा मिळालेल्या या गौरवामुळे त्यांच्या कार्याची उंची अधिक अधोरेखित झाली आहे.

लेखापरीक्षण क्षेत्रात बारकाई, पारदर्शकता आणि जबाबदारी या गुणांच्या आधारे संतोष तरटे यांनी विश्वासार्हतेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. आर्थिक शिस्त, नियमांचे काटेकोर पालन आणि अचूक अहवाल सादरीकरण या बाबींमध्ये त्यांनी सातत्याने उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. त्यामुळे विविध विभागांमध्ये त्यांच्या कामाबाबत विशेष विश्वास निर्माण झाला आहे.



मागील वर्षी राज्यात प्रथम क्रमांक मिळवून त्यांनी आपल्या कार्यक्षमतेची भक्कम छाप उमटवली होती. त्या यशाची पुनरावृत्ती करत यंदाही राज्यस्तरीय सन्मान मिळवणे हे त्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रम आणि निष्ठेचे द्योतक ठरले आहे.

आतापर्यंत संतोष जनार्दन तरटे यांना तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. विविध संस्थांचे लेखापरीक्षण करताना त्यांनी आर्थिक पारदर्शकतेसाठी मोलाचे योगदान दिले असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक संस्थांचे कामकाज अधिक सक्षम आणि नियमबद्ध झाले आहे.

संतोष तरटे यांचे हे यश संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरले असून विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या यशातून तरुणांना प्रामाणिकपणा आणि कष्ट यांच्या जोरावर यश संपादन करण्याची प्रेरणा मिळत आहे. भविष्यातही ते अशाच प्रकारे यशाची नवी शिखरे गाठतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## काष्टीतून करिअरची उंच झेप!

### परिक्रमा तंत्रनिकेतनचे ३६८ विद्यार्थी थेट उद्योगविश्वात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील परिक्रमा तंत्रनिकेतन पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आलं आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात तब्बल ३६८ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड होऊन संस्थेने ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. विशेष म्हणजे मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि सिव्हिल विभागांनी १००% प्लेसमेंट साध्य करत नो स्टुडंट लेफ्ट बिहाइंड ही टॅगलाईन अक्षरशः जगून दाखवली आहे.बबनरावजी पाचपुते विचारधारा ट्रस्टच्या परिक्रमा शैक्षणिक संकुलातील या महाविद्यालयाने शिक्षणाचा उच्च दर्जा, आधुनिक सुविधा आणि उत्कृष्ट वसतिगृह व्यवस्थेमुळे राज्यभरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे महाराष्ट्रभरातून विद्यार्थी येथे प्रवेशासाठी आकर्षित होत आहेत.तसेच प्लेसमेंट ड्राइव्ह इंडस्ट्री थेट कॅम्पसमध्ये होत आहेत या भव्य प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये अनेक नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये प्रमुख कंपन्या पुढीलप्रमाणे एसपीएम ऑटोकोम्प सिस्टिम, जाबिल सर्किट इंडिया, झेड एफ स्टीयरिंग गिअर इंडिया, फियाट इंडिया ऑटोमोबाइल्स,सीएट, जॉन डिअर इंडिया,टाटा ऑटोकोम्प सिस्टिम्स,बजाज ऑटो,मायक्रोटेक डेव्हलपर्स,आरपीजी ग्रुप,जनरल इंडस्ट्रियल कंट्रोल्स इत्यादी. कंपन्यांमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आणि ३६८ विद्यार्थ्यांनी क्लासरूम ते कॉर्पोरेट हा प्रवास यशस्वीरित्या पूर्ण केला.त्यांच्या यशामागची सूत्रं म्हणजे सातत्यपूर्ण मेहनत,तांत्रिक कौशल्य ,आत्मविश्वास,योग्य मार्गदर्शन असल्याचे बोलले जात आहे

महाविद्यालयाचा एकदम सिंपल फॉर्म्युला म्हणजे घासून घ्या, तरच चमकता! यावरून दर्जेदार शिक्षण आणि योग्य दिशा मिळाली, तर गावाकडचा विद्यार्थीही जागतिक स्तरावर झेंडा रोवू शकतो, हे परिक्रमा तंत्रनिकेतनने पुन्हा सिद्ध केलं आहे. त्यामुळे या यशाबद्दल संस्थापक माजी मंत्री बबनराव (दादा) पाचपुते, अध्यक्षा डॉ. प्रतिभाताई पाचपुते, तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, प्लेसमेंट अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.

### राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी अपंग कल्याण केंद्रात

## स्व. आ.अरुण जगताप यांची जयंती सामाजिक उपक्रमांनी साजरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राष्ट्रसंत आचार्य आनंद ऋषीजी अपंग कल्याण केंद्र, कल्याण रोड येथे स्वर्गीय आमदार अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी दिव्यांग व मतिमंद विद्यार्थ्यांसोबत जयंती साजरी करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना माजी नगरसेवक दगडू मामा पवार म्हणाले की, समाजामध्ये वावरताना प्रत्येकाने समाजाचे काहीतरी देणे लागते या भावनेतून काम केले पाहिजे. आपल्या उत्पन्नातून काही रक्कम बाजूला ठेवून दीनदुबळ्यांसाठी खर्च करणे हीच खरी समाजसेवा आहे. दिव्यांग व मतिमंद मुलांची सेवा हीच ईश्वर सेवा आहे, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, स्वर्गीय अरुण काका जगताप यांनी नेहमीच सर्वसामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून काम केले.



त्यांच्या कार्याचा आदर्श प्रत्येकाने अंगीकारणे गरजेचे आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी दिलेल्या दहा गुंठे जागेमुळे आज या ठिकाणी चांगली शाळा उभी राहिली आहे. त्यांच्या जाण्याला एक वर्ष पूर्ण झाले असले तरी त्यांच्या आठवणी आजही प्रत्येकाच्या मनात जिवंत आहेत, असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास माजी नगरसेवक दगडू मामा पवार, विलास ताठे, योगेश ठुबे, बाळासाहेब निकम, पैलवान गोरख खंडागळे, नगरसेवक रेवणनाथ पवार, दीपक खेडकर, नितीन घोडके, विशाल पटवेकर, ब्रिजेश ताठे, स्वप्निल ताठेड, संजू भुतकर, कान्हा गायकवाड, योगेश आजबे, रोहित भगत, योगेश भुजबळ, कृष्णा वाळुंजकर, सुरज चांदगुडे, सौरभ जरे, दादासाहेब पांडुळे, साहिल चांदगुडे, रोहन दळवी, किरण मेहत्रे, संतोष मगर, सागर नाईकवाडी आदींसह युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रसंत आचार्य आनंद ऋषीजी अपंग कल्याण केंद्राच्या वतीने स्व. अरुण काका जगताप यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या कार्याची आठवण करण्यात आली. उपस्थित कार्यकर्त्यांनी त्यांच्या समाजाभिमुख कार्याचा गौरव केला.

नगरसेवक रेवणनाथ पवार म्हणाले की, स्व. काकांच्या आठवणींनी मन भावूक होते. प्रत्येक व्यक्तीची आत्मीयतेने विचारपूस करणारे आणि कुटुंबातील सदस्यांशी जिव्हाळ्याने वागणारे ते नेते होते.

ते पुढे म्हणाले की, दगडू मामा पवार मित्र मंडळाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत दिव्यांग व मतिमंद विद्यार्थ्यांमध्ये जाऊन जयंती साजरी करणे हा सकारात्मक उपक्रम आहे.

द•ख•ल

## अर्धशतकवीर पुरस्काराने अमोल लेंढे सन्मानित



**बारामती :** भारतीय आयुर्विमा महामंडळ (डखउ) शाखा बारामती यांच्या वतीने विमा प्रतिनिधी. अमोल अभिमन्यू लेंढे यांना सन २०२५-२६ या वर्षासाठीचा प्रतिष्ठेचा अर्धशतकवीर पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे बारामती परिसरात त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.लेंढे हे गेल्या आठ वर्षांपासून एलआयसीमध्ये विमा प्रतिनिधी म्हणून कार्यरत असून त्यांनी आपल्या प्रामाणिकपणा, सातत्य आणि ग्राहकांशी जपलेला विश्वास याच्या बळावर यशाची शिखरे गाठली आहेत. सन २०२५-२०२६ या कालावधीत त्यांनी 'आनंदा' योजनेअंतर्गत तब्बल ५० विमा पॉलिसी पूर्ण केल्या. या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत त्यांना आनंदा अर्धशतकवीर हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.या यशामागे चीफ ॲडव्हायझर राजन कलंत्रे, वरिष्ठ शाखा अधिकारी श्री. कांबळे, उपशाखा अधिकारी वेताळ साहेब तसेच सर्व विमाधारकांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभल्याचे लेंढे यांनी सांगितले. ग्राहकांच्या विश्वासाला पात्र ठरत सातत्याने उत्कृष्ट सेवा देण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यांच्या या यशामुळे बारामती परिसरातील विमा क्षेत्रात कार्य करणाऱ्या इतर प्रतिनिधींनाही प्रेरणा मिळत आहे.

## आळंदीत शहीद दिना निमित्त विनम्र अभिवादन

**आळंदी :** संत ज्ञानेश्वर प्रवासी वाहतूक रिक्षा संघटना व जाणीव संघटना, कष्टकरी कामगार पंचायत, अलंकापुरी शहर पत्रकार यांच्यसंयुक्त विद्यमाने आज रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर, खंडोबा मंदिर रोड परिसर येथे क्रांती पार्क या ठिकाणी शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना ९५ व्या बलिदान दिना निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी पत्रकार महादेव पाखरे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लाभले.या प्रसंगी नर्शिग गायकवाड, सतिश ठाकूर, रामदास सुर्यवंशी, प्रमोद बुकने, सतिश थोरवे, गणेश गावडे, नंदू कुटे, पंकज शिंदे, संजय वाबळे, संदीप रंधवे, धीरज कांबळे, दत्ता चौधरी,नमदेवचौढरी, राहुल पाटोळे, गणपत घुंड्रे, चंदू कबके,नितीन शेठ अरगडे , नितीन नाहाते, रुक्साना सुलतान भाई शेख, विशुद मेटे , संगीता मेटे, अफसाना भाभी , सुयोग कांबळे, श्रीरंग पोटे, चंदू सवंडकर, अण्णा वागमारे, वंचित बहुजन आघाडी चे कार्य कर्ते तसेच आळंदी कर ग्रामस्थ उपस्थित होते प्रास्ताविक व आभार सुलतान भाई शेख यांनी केले



## विश्वशांती शिरुर मध्ये ''विश्वप्रार्थना''

**शिरुर:** जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर विश्वशांती आणि मानवकल्याणासाठी शिरूरमध्ये 'विश्वप्रार्थना' जपयज्ञाचे आयोजन करण्यात आले. जीवनविद्या मिशनच्या शिरूर ज्ञानसाधना केंद्रामार्फत शिवसेवा मंडळ महादेव मंदिर येथे हा उपक्रम




उत्साहात पार पडला.विश्वसंत सद्गुरू श्री वामनराव पै यांच्या प्रेरणेने 'हे जग सुखी व्हावे व हिंदुस्तान राष्ट्र सर्वार्थाने प्रगत व्हावे' या उदात्त ध्येयातून या प्रार्थना जपयज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वांना चांगली बुद्धी, आरोग्य, सुख आणि कल्याण लाभावे अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली.या जपयज्ञात शिरूर शाखेतील नामधारकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. अहिल्यानगर येथील शंकरदादा गणगे, महेश रासने, शामकांत वर्पे यांच्यासह आशिष जावळे परिवार, संजय बढे व परिवार, अनारसे सर, महेश कोकरे, शितोळे सर, इंद्रभान गायकवाड, सुभाष चोरडिया आदींसह अनेक महिला-पुरुष उपस्थित होते

## मॉडेल स्कुल शिंगवे (पारगाव ) शाळेचे पाच विद्यार्थी नवोदय प्रवेश पात्र

**शिंगवे पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद मॉडेल स्कूल शिंगवे शाळेचे स्वरा महेश झोडगे,सिद्धेश जालिंदर पोंदे,विहान महेंद्र पोखरकर,ऋषिकेश शरद रोडे तसेच रिषभ संजय आहिरे असे सर्वाधिक पाच विद्यार्थी जवाहर नवोदय परीक्षा २०२६ मध्ये प्रवेश पात्र ठरल्याची माहिती मुख्याध्यापक नवनाथ शिनलकर यांनी दिली.विविध स्पर्धा परीक्षा,कला,क्रीडा,संगणक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणारी जिल्हा परिषद शाळा अशी शाळेची जिल्ह्यात ओळख निर्माण झाली आहे.शाळेचे आत्तापर्यंत शेकडो विद्यार्थी शासकीय शिष्यवृत्ती,नवोदय परीक्षेत झळकले आहेत.केंद्रीय जवाहर नवोदय प्रवेश परीक्षा २०२६ मध्ये शाळेचे पाच विद्यार्थी प्रवेश पात्र ठरले असून त्या सर्व विद्यार्थ्यांचे यापुढील इयत्ता सहावी ते दहावी पर्यंतचे शिक्षण उइडए बोर्डाच्या केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालय पिंपळे जगताप,पुणे या ठिकाणी मोफत होणार असल्याची माहिती मार्गदर्शक शिक्षक श्री.जालिंदर पोंदे यांनी दिली. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना जालिंदर पोंदे,नवनाथ शिनलकर,अशोक लोखंडे,श्रीकृष्ण डुकरे,सुभाष इंदोरे,विलास भोर,राजेंद्र बोंबे,धनंजय पवार,वैजयंता लोखंडे,संगीता इंदोरे,वर्षा लोंढे,चित्रा पंडित यांनी मार्गदर्शन केले. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश पात्र ठरल्याने विद्यार्थी,पालक व मार्गदर्शक शिक्षकांचे पंचायत समिती आंबेगावच्या वतीने गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज,गटशिक्षणाधिकारी रुपाली धोका,विस्तार अधिकारी कल्पना टाकळकर,शैला निमसे,केंद्रप्रमुख राजू जाधव यांनी तसेच भीमाशंकर कारखान्याचे संचालक नितीन वाव्हळ,सरपंच सीता पवार,उपसरपंच हिरामण गोरडे,मा.संतोष वाव्हळ,चेअरमन दत्ता गोरडे,पोलीस पाटील गणेश पंडित,अध्यक्ष समीर गोरडे, उपाध्यक्ष रेखा पाबळे,वैजनाथ येंधे,रमेश डोके,महेश बांगर,गोरक्षनाथ जगताप,शशी मेहेत्रे,योगेश कासार,समर्थ पंडीत तसेच पालक व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.



स्वरा महेश झोडगे | सिद्धेश जालिंदर पोंदे | विहान महेंद्र पोखरकर | ऋषिकेश शरद रोडे | ऋषभ संजय अहिरे

# फुलांचे बाजारभाव पडल्याने शेतकरी अडचणीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** आंबेगावच्या पूर्व भागातील मेंगडेवाडी, जारकरवाडी, पोंदेवाडी, लाखणगाव आदी गावांतील अनेक शेतकऱ्यांनी फुल शेती केली आहे परंतु फुलांचे बाजारभाव पडल्याने फुल उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे वाळुंजनगर येथील फुल उत्पादक शेतकरी तानाजी वाळुंज व मेंगडेवाडी येथील फुल उत्पादक शेतकरी सागर रणपिसे यांनी दोन एकर शेतात मारब्ले या जातीची फुल लागवडी केली आहे

या दोन्ही शेतकऱ्यांची फुले तोडणीसाठी आली असून फुलांचा बाजारभाव पडल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे वाळुंज यांनी दीड एकर क्षेत्रात कलींगड पिकात अप्सरा झेंडुचे आंतरपीक घेतले होते कलींगड पिकाला समाधानकारक भाव मिळाला परंतु झेंडु फुलाला अत्यल्प बाजारभाव मिळत असल्याने झेंडुचा खर्च निघत नसल्याचे तानाजी वाळुंज यांनी सांगितले फुलांचे कोसळलेले बाजारभाव, वाढते तापमान, उत्पादनातील घट आणि खराब होऊ लागलेली फुले यामुळे फुलउत्पादक शेतकरी अडचणीत आले आहेत.



> ''वाढत्या तापमानामुळे फुलांची प्रतही कमी झाली असून, फुले खराब होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यातच सध्या परीक्षांचा कालावधी सुरू असल्याने मागणी घटली आणि बाजारभाव कोसळल्याचे चित्र दिसत आहे त्यामुळे फुल उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे
> जयेश वाळुंज - मोरया फर्टिलायझर

दिवाळीनंतर सुरू होणारी लग्नसराई, विविध सण-उत्सवांमुळे फुलांना मोठी मागणी असते. त्यामुळे अल्पावधीत चांगले उत्पादन मिळत असल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणावर फुलशेती करतात. यंदाही अधिक बाजारभाव मिळतील, चांगले उत्पन्न होईल या अपेक्षेने शेतकऱ्यांनी फुलांची लागवड केली होती. पिकाच्या वाढीसाठी खते, कीडनाशक फवारणी आणि मजुरीवर मोठा खर्चही करण्यात आला. मात्र यंदा ऐन हंगामात फुलांना मागणी घटली आहे. अचानक वाढलेल्या तापमानामुळे बहुतांश शेतकऱ्यांच्या फुलांच्या उत्पादनात जवळपास निम्मी घट झाली आहे. तसेच फुलांच्या पाकळ्या खराब होऊ लागल्याने बाजारभावही कोसळले आहेत. सध्या झेंडूला किलोमागे २० ते ३० रुपये, बिजलीला १० ते २० रुपये, शेवंतीला सुमारे १०० रुपये, आष्टरला ६० ते ७० रुपये भाव मिळत असल्याने परिणामी, पिकासाठी केलेला खर्चही निघणे कठीण होत असल्याचे मेंगडेवाडी येथील फुल उत्पादक सागर रणपिसे यांनी सांगितले

## राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार पक्षाचा सुनेत्रा पवार यांना पाठिंबा बारामती विधानसभा पोट निवडणुकीसाठी पुढाकार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड शहर :** दिवंगत उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार यांच्या निधनाने रिक्त झालेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत पक्षाच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी घेतलेल्या निर्णयानुसार पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाच्या वतीने पाठिंबा देण्याचा ठराव नुकत्याच झालेल्या पुणे येथील कार्यालयात पक्षाच्या बैठकीत करण्यात आला. अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष पुणे जिल्हाध्यक्ष कोलते यांनी दिली. बारामती व मावळ लोकसभा मतदारसंघाच्या पुणे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची बैठक पुणे येथे २१मार्च रोजी आयोजित करण्यात आलेली होती. त्या बैठकीमध्ये भविष्यात तरुणांना बरोबर घेऊन पक्ष संघटना बळकट करण्यावर कार्यकर्त्यांनी भर दिला. आगामी निवडणुकीमध्ये सहकार, ग्रामपंचायत या निवडणुकीमध्ये स्थानिक पातळीवर तडजोड करण्यास हरकत नाही. अशाही सूचना बैठकीत करण्यात आल्या. महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पुण्याचे माजी उपमहापौर ॲड अंकुश काकडे, कोल्हापूरचे निरीक्षक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल प्रवक्ते विकास लवांडे, दौंड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल रामभाऊ टुले व मुळशी पंचायत समितीच्या उपसभापती पदी निवड झाल्याबद्दल दगडू करंजावणे यांचा जिल्हाध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



पुणे जिल्हा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची बैठक पुणे येथे संपन्न झाली. या बैठकीमध्ये दौंड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी रामभाऊ टुले यांच्या निवडीचे पत्र देताना जिल्हाध्यक्ष विजय कोलते, प्रदेशचे उपाध्यक्ष अंकुश काकडे, अनंतराव चौगुले इत्यादी

या बैठकीमध्ये सर्व तालुकाध्यक्षांनी आपल्या तालुक्यातील कामकाजाचा आढावा दिला. खा. सुप्रिया सुळे यांनी दूरध्वनीप्रणाली द्वरे आपले विचार मांडले, व सर्व कार्यकर्त्यांनी पुन्हा कामाला लागावे असे आवाहन केले. या बैठकीचे प्रास्ताविक महिला अध्यक्ष भारती शेवाळे यांनी केले. आभार युवक अध्यक्ष प्रमोदसिंह गोतारणे यांनी मानले.

## कवठे येमाई येथे बिबट्याचा धुमाकूळ

### गोठ्यात घुसून २१ कोंबड्या व बदकाचा फडशा, शेतकऱ्याचे मोठे नुकसान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील कवठे येमाई परिसरात बिबट्याच्या हालचालींनी पुन्हा एकदा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. फाकटे रोडनजीक टावरे वस्ती येथील गट नंबर ४४/१अ येथे शेतकरी अफजल इनामदार यांच्या शेतातील गोठ्यावर बिबट्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अफजल इनामदार यांच्या गोठ्याभोवती सुमारे ७ फूट उंचीची जाळी बसविण्यात आली होती. मात्र, रात्रीच्या सुमारास बिबट्याने ही जाळी ओलांडून गोठ्यात प्रवेश केला. यावेळी गोठ्यात पाळलेल्या बदकासह २० ते २५ गावरान कोंबड्यांवर हल्ला करून त्यांचा फडशा पाडला. या घटनेत इनामदार यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.सकाळी अफजल इनामदार यांच्या पत्नी आशाबी इनामदार व मुले गोठ्यावर गेल्यानंतर हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. गोठ्यातील मृत कोंबड्या व बदकांचे अवशेष पाहून त्यांनी तात्काळ ग्रामस्थांना माहिती दिली.

या घटनेनंतर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. आशाबी इनामदार यांच्यासह स्थानिक शेतकऱ्यांनी वनविभागाने तात्काळ पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी केली आहे.दरम्यान, या घटनेची माहिती वन विभागाचे कर्मचारी हनुमंत कारकुड यांना देण्यात आली असून त्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच लवकरात लवकर पिंजरा लावण्याबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.ग्रामीण भागात वाढत्या बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून वन विभागाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सानू इनामदार व नागरिकांकडून होत आहे.

## स्त्री शक्ती सन्मान उपक्रमातून महिलांना स्वावलंबनाची दिशा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** सासवड येथे २० मार्च रोजी नगरपरिषद आणि कुशाग्र इनोव्हेशन्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्त्री शक्ती सन्मान' उपक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमातून महिलांना सन्मानाबरोबरच स्वावलंबनाच्या नव्या संधींची दिशा देण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. नगराध्यक्षा आनंदी जगताप, महिला व बालकल्याण सभापती प्रियांका जगताप, उपसभापती लीना वढणे तसेच नगरसेविका शीतल भोंडे, अर्चना जगताप, स्मिता सुहास जगताप आणि स्मिता उमेश जगताप उपस्थित होत्या.

प्रास्ताविकात प्रशांत शिंदे यांनी कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट केले, तर विकास चव्हाण यांनी फाउंडेशनच्या राज्यभर सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. गीता फाटक यांनी घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रातील व्यवसाय संधींबाबत मार्गदर्शन करत स्वावलंबनाचा संदेश दिला. कार्यक्रमात शहर स्वच्छतेत महिलांचा सहभाग वाढविणे आणि त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. तसेच उपस्थित महिला व सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. ार्यक्रमासाठी डीईएनयूएलएम विभागाच्या जस्मिन मधाळे व आरोग्य विभागाच्या रामचंद्र कारंडे यांच्या टीमचे सहकार्य लाभले. शेवटी विकास चव्हाण यांनी आभार मानले.

## महिलांसाठी घनकचरा व्यवस्थापनात नवे व्यवसायिक मार्ग; सासवडमध्ये सन्मान सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :-** महिलांना स्वावलंबनाच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सासवडमध्ये आयोजित 'स्त्री शक्ती सन्मान' सोहळ्यात घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रातील व्यवसायिक संधींवर विशेष भर देण्यात आला.नगरपरिषद सासवड व कुशाग्र इनोव्हेशन्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक प्रशांत शिंदे यांनी मांडले, तर विकास चव्हाण यांनी संस्थेच्या राज्यभर सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. 'सक्षम' प्रकल्पाच्या गीता फाटक यांनी महिलांसाठी घनकचरा व्यवस्थापनातील रोजगार व उद्योजकतेच्या संधी स्पष्ट केल्या. यावेळी शहर स्वच्छतेशी निगडित उपक्रमांमध्ये महिलांचा सहभाग वाढवण्यावर भर देण्यात आला. कार्यक्रमादरम्यान विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांसह सफाई कर्मचारी महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या आयोजनात जस्मिन मधाळे, आरोग्य विभागाचे रामचंद्र कारंडे व त्यांच्या टीमचे विशेष योगदान राहिले



सासवड येथे आयोजित 'स्त्री शक्ती सन्मान' सोहळ्यात विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या महिलांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले; यावेळी मान्यवरांसमवेत सन्मानित महिला.

> घनकचरा व्यवस्थापन क्षेत्र महिलांसाठी मोठी संधी आहे. यामधून उत्पन्नाबरोबरच शहर स्वच्छतेलाही हातभार लागेल, असे मत प्रकल्प व्यवस्थापक गीता फाटक यांनी व्यक्त केले.

## भीमाशंकर कारखाना साखर शाळेसाठी दोन वर्गखोल्या मंजूर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** भीमाशंकर सहकारी साखर कारखाना (पारगाव ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक साखरशाळेत शिक्षण घेणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी पुणे जिल्हा परिषद नवनिर्वाचित जिल्हा परिषद .चे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी दोन नवीन वर्गखोल्या मंजूर केल्या असून त्यासाठी तब्बल २८ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निर्णयामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार असून शिक्षणासाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. (कारखाना ) परिसरात ऊसतोड कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. या कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत, यासाठी स्थानिक पातळीवर विविध प्रयत्न केले जात आहेत. मात्र, शाळेत वर्गखोल्यांची कमतरता असल्यामुळे विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. काही वेळा एकाच वर्गात अनेक विद्यार्थ्यांना बसवावे लागत होते, त्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होत होता.या पार्श्वभूमीवर विवेक वळसे पाटील यांनी शाळेला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली आणि तातडीने दोन नवीन वर्गखोल्या मंजूर करण्याचा निर्णय घेतला. मंजूर निधीतून लवकरच बांधकामास सुरुवात होणार असून विद्यार्थ्यांना स्वतंत्र व सुसज्ज इमारती मिळाल्याने शिक्षण सहज सुलभ होणार आहे त्यामुळे ऊसतोड मजुरात समाधान पसरले आहे .याबाबत माहिती देताना भिमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनी सांगितले की, ऊस कामगारांच्या मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध आहे. या निर्णयाचे शाळेचे शिक्षक, ग्रामस्थ आणि पालकांनी स्वागत केले असून लवकरात लवकर वर्गखोल्यांचे बांधकाम पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## आचार्य अत्रे प्रतिष्ठान कडून जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरसेवकांचा सत्कार

**नितीन यादव ! राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** यशवंतरावजी चव्हाण यांनी महाराष्ट्रामध्ये पंचायत राज्याची निर्मिती १९६२ साली केली. ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद असा त्रिस्तरीय कारभार सुरू झाला. यामधून काम करणारे अभ्यासू व लोकांच्यासाठी वेळ देणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी निर्माण झाली. त्यामुळे खेड्यापाड्यातील गावांचा विकास झाला. भविष्यामध्ये पंचायत समिती व जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागात विकासाचे काम करण्यासाठी सज्ज व्हावे. असे विचार माजी मंत्री तथा पुरंदर हवेलीचे आमदार विजयबापू शिवतारे यांनी व्यक्त केले . पुरंदर तालुक्यातील पंचायत समितीचे सभापती पदी अमित भाऊसाहेब झेंडे व उपसभापती प्रवीण जगताप यांचा सत्कार शिवतारे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते.




आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदर या संस्थेने आयोजित केलेल्या सत्कार समारंभाचे अध्यक्ष विजय कोलते होते . शिवतारे म्हणाले की, नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळ, आंतरराष्ट्रीय शेती,व्यापारासाठी व पुरंदर उपसा, जनाई - शिरसाई व गुंजवणीच्या प्रकल्पामधून होणारी हरित क्रांती यामुळे पुरंदरच्या तरुणांचे भविष्य बदलेल. पुरंदर मध्ये आयटी पार्क होत आहे. यामधून हजारोंना संधी मिळेल. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष जालिंदर कामठे म्हणाले की, पुरंदर तालुक्यामध्ये दोन्ही राष्ट्रवादी व शिवसेना यांची युती झाल्याने आगामी ग्रामपंचायत, साखर कारखाने व सहकारातून सर्व निवडणुका आम्ही जिंकू .तसेच सोलापूर जिल्हा परिषदेच्या सदस्य रश्मी बागल कोलते,दिवे गराडे मतदारसंघातील जि.प. सदस्य रुपाली अमोल झेंडे, कोळविरे निरा गटातील जि.प. सदस्य डॉ. प्राजक्ता दिगंबर दुर्गाडे यांच्यासह पंचायत समिती सदस्य माणिक निंबाळकर, मोनाली कांबळे, स्मिता निगडे, अर्चना कटके यांचाही सत्कार करण्यात आला.जिल्हा परिषद निवडणुकीत पक्षाच्या वतीने उत्तम लढत दिल्याबद्दल गौरव कोलते, पुष्कराज जाधव व भारती अतुल मस्के यांचाही सत्कार करण्यात आला. पंचायत समितीमध्ये निवडणूक लढविलेले निलेश कृष्णा जगताप, अजिंक्य रामदास कड, पूजा सागर मोकाशी, उत्तम धुमाळ यांचाही सत्कार करण्यात आला. याप्रसंगी तालुका राष्ट्रवादी अध्यक्ष उत्तमबापू धुमाळ, तालुका शिवसेनाप्रमुख उमेश गायकवाड, नगरसेवक मंदार गिरमे , राजेंद्र टकले, बाळासाहेब भिंताडे , प्रीतम म्हेत्रे यांचाही श्री शिवतारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ॲड अण्णासाहेब खाडे , ॲड दिलीप निरगुडे , ॲड.तानाजी घारे , दत्ताआबा चव्हाण, रामचंद्र काळे, माऊली मेमाणे, कुंडलिक मेमाणे , माई कोलते उपस्थित होते. शांताराम पोमण यांनी प्रास्ताविक केले व बंडू जगताप यांनी आभार मानले. तर सचिन घोलप यांनी सूत्रसंचालन केले.

## पुरंदरच्या राजेवाडीत संत साहित्यकांची मंदियाळी श्रीराम मूर्तिची झाली पुनस्थापना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुरंदर :** तालुक्यातील राजेवाडी गावात ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरेला उजाळा देणारा श्रीराम मूर्ती पुनर्स्थापना सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. सुमारे अडीचशे वर्षांचा वारसा लाभलेल्या प्राचीन श्रीराम मंदिरातील मूर्तींची विधिवत पुनर्प्रतिष्ठा करण्यात आली. या सोहळ्याला संत, साहित्यिक आणि अभ्यासकांची विशेष उपस्थिती लाभली. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी अध्यक्ष ह.भ.प डॉ. भावार्थ देखणे,मंदिर स्थापत्य व मूर्ती शास्त्र ज्येष्ठ अभ्यासक डॉक्टर गो ब देगलूरकर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर सह अध्यक्ष ह भ प गहिनीनाथ महाराज औसेकर वेदांत सत्संग समिती डॉक्टर नारायण महाराज जाधव ह.भ.प. नारायण महाराज जाधव, ज्येष्ठ मूर्तीशास्त्र अभ्यासक देगलूरकर यांच्या हस्ते मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली यावेळी आळंदी देवस्थान ट्रस्टी प्रताप पाटील राजेवाडी सरपंच दत्तात्रय जगताप ग्रामपंचायत सदस्य पत्रकार राजेंद्र शिंदे केशव स्वरूप निवास नगरकर कार्यक्रमाचे आयोजन काकडे सर उपस्थित होते याप्रसंगी ह भ प श्री चंद्रकांत महाराज वांजळे यांचे रामायण विषयावरती सुश्राव्य असे किर्तन झाले गुढीपाडव्या दिवशी श्रीराम मूर्तीची भव्य अशी मिरवणूक राजेवाडी गावात काढण्यात आली.

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक जन्म-मृत्यु एसआर-३७/२०२६
नेवासा दिनांक ०२/०३/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-आदेश लक्ष्मण राऊत, रा.जळके बुद्रुक, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम/कु.आदेश लक्ष्मण राऊत, रा.जळके बुद्रुक, ता. नेवासा यांचा महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-आदेश लक्ष्मण राऊत, गावाचे नाव-जळके बुद्रुक, जन्म दिनांक-०१/०६/२००६ करिता या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

(शिक्का)

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मी राजेंद्र महादेव धुर्वे रा. दापोडी ता. दौंड मी मा. तहसीलदार ( पत्र क्र. फौज/कावी/१२४३/२०२५ दौंड दि. २७.१०.२०२५) व मा. उपविभागीय अधिकारी दौंड ( पत्र क्र. फौज. जन्म-मृत्यू/एसआर/२२४/२०२५ दि.१५.१०.२०२५) यांचेकडे माझी जन्मनोंद करण्यास अर्ज दाखल केलेला आहे. याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी दौंड तहसीलदार कार्यालय व उपविभागीय कार्यालय यांच्याशी संपर्क साधवा.

**आपला विश्वासू**
**राजेंद्र महादेव धुर्वे**
**रा. दापोडी ता. दौंड**

# पाथर्डीत घरफोडीचा धक्कादायक प्रकार

# दागिने व रोकड लंपास,भीतीचे वातावरण



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** शहरातील एडके कॉलनी परिसरात पुन्हा एकदा घरफोडीची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अज्ञात चोरट्यांनी बंद घराचा दरवाजा तोडून घरात प्रवेश करत सुमारे अडीच तोळे सोन्याचे दागिने आणि ८ हजार रुपयांची रोकड असा एकूण सुमारे ७०,५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. या घटनेमुळे परिसरातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून पोलिसांच्या गस्तीबाबतही नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी युवराज सीताराम वायळ (वय ४३), व्यवसायाने शिक्षक असून ते १७ मार्च रोजी सकाळी आपल्या कोळेवाडी (ता. राहुरी) येथील मूळ गावी गेले होते. त्यांच्या गैरहजेरीची संधी साधत चोरट्यांनी २१ मार्च रोजी पहाटेच्या सुमारास त्यांच्या घरावर डल्ला मारला. बंद घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केल्यानंतर चोरट्यांनी घरातील कपाट उचकटत त्यामधील मौल्यवान वस्तूंवर हात साफ केला.

चोरीस गेलेल्या मुद्देमालामध्ये अंदाजे ५० हजार रुपये किंमतीचे दोन तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, सुमारे १२,५०० रुपये किंमतीचे पाच ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण आणि ८ हजार रुपयांची रोकड यांचा समावेश आहे. घरफोडी झाल्याची माहिती मिळताच युवराज वायळ तातडीने पाथर्डीत परतले असता त्यांना घरातील सर्व वस्तू अस्ताव्यस्त अवस्थेत दिसून आल्या आणि चोरी झाल्याचे स्पष्ट झाले.या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. घटनास्थळी पाहणी करून चोरट्यांचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.दरम्यान, शहरात अलीकडील काळात घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे. विशेषतः बंद घरे हेरून चोरट्यांकडून अशा घटना घडत असल्याने नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे. पोलिसांनी रात्रीच्या गस्तीमध्ये वाढ करून चोरट्यांवर लगाम लावावा, तसेच अशा घटनांचा लवकरात लवकर छडा लावावा, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## द•ख•ल

### साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कथास्पर्धा

**अहिल्यानगर :** साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे म्हणजे मराठी साहित्याचा मानबिंदू. त्यांच्या याच कार्याचची पुन्हा एकदा समाजाला ठळक ओळख व्हावी आणि नवीन लेखकांना कथालेखनाची उर्मी मिळावी या उद्देशाने ज्ञानकौशल्य ट्रस्ट आणि श्रोता ऑडिओ बुक यांच्यातर्फे 'साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे कथा स्पर्धा २०२६' या स्पर्धेचे आयोजन केलेले आहे. यामध्ये सहभागी होण्यासाठी वयाची कोणतीही अट नसल्याची माहिती संयोजक लेखक सचिन मोहन चोभे यांनी दिली आहे.

### शहीद भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त मनपाकडून अभिवादन

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने थोर क्रांतिवीर शहीद भगतसिंग, शहीद सुखदेव व शहीद राजगुरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी देशासाठी बलिदान देणाऱ्या या क्रांतिकारकांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांचे कार्य व विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला. कार्यक्रमास महापौर ज्योतीताई गाडे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, उपायुक्त मेहेर लहारे, शेखर देशपांडे, राजेश लयचिट्टी, अनिल लोंढे यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेले बलिदान हे अमूल्य आहे. त्यांच्या त्यागामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा श्वास घेत आहोत. त्यांच्या विचारांमधून तरुणांनी प्रेरणा घेऊन देशाच्या विकासासाठी योगदान द्यावे. त्या पुढे म्हणाल्या की, देशप्रेम, त्याग व समर्पण या मूल्यांची जपणूक करणे ही आजच्या काळाची गरज आहे. क्रांतिकारकांनी दाखविलेल्या मार्गावर चालत समाजहिताचे कार्य करण्याची प्रेरणा प्रत्येकाने घ्यावी. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही क्रांतिकारकांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन केले.

### 'होम मिनिस्टर' कार्यक्रम उत्साहात

**अहिल्यानगर :** महिला दिनानिमित्त बुरुडगाव रोड येथील साई उद्यान येथे जिजाऊ महिला प्रतिष्ठानच्या वतीने 'होम मिनिस्टर' कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला असून विविध उपक्रमांच्या माध्यमातून महिलांना आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळाली. यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे यांनी सांगितले की, सावित्रीबाई फुले यांनी महिलांच्या शिक्षणाची दारे खुली करून दिल्यामुळे आज महिला सर्वच क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. महिला ही फक्त कुटुंबाची नव्हे तर संपूर्ण देशाच्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. त्या पुढे म्हणाल्या की, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सहकार्यामुळे सावित्रीबाई फुले यांनी महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. जिजाऊ माँसाहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडविले.

# दहेश्वर विद्यालयात शहीद दिनानिमित्त अभिवादन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरापूर :** श्री मारुतरावजी घुले पा शिक्षण संस्थेचे दहेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ जूने ता शेवगाव आज विद्यालयात भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी प्राणाची आहुती दिली त्या निमित्त शहीद दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब शिंदे होते.

या वेळी भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या प्रतिमेचे पूजन इ. ५ वी च्या विद्यार्थिनींनी केले प्रास्ताविकात वाघमारे सरांनी शहीद दिनाचे महत्व सांगून अभिवादन केले साक्षी विखे, शर्वरी मगर, सारिका जाधव, प्रियल गांधी, मंजुळा सम्रद, विहान निकाळजे या विद्यार्थ्यांनी शहीद दिनानिमित्त मनोगत व्यक्त केली मुख्याध्यापक इंगावले सरांनी भाषणात सांगितले की, भगतसिंग ,सुखदेव आणि राजगुरू यांच्या बलिदानाची आठवण करुन देतो या दिवशी तरुण स्वातंत्र्य सैनिकांनी हसत हसत फासावर जाणे स्वीकारले



देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वोच्च बलिदान दिले त्यांच्या त्यागाला स्मरुन आपण कृतज्ञता व्यक्त करतो त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची प्रतिज्ञा करतो माझा भारत, माझी जबाबदारी या संकल्पनेने शहीद दिन साजरा करत आहोत या द्वारे आजच्या तरुणांना जाणिवपूर्वक कृती आणि नागरिक जबाबदारीच्या माध्यमातून त्यागाचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी तरुणांची आहे असे आवाहन करुन या थोर क्रांतिकारकांना अभिवादन केले. अध्यक्षीय भाषणात बाळासाहेब शिंदे यांनी भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या कार्याविषयी माहिती सांगताना म्हटले की, शहीद दिन फक्त त्यांना श्रध्दांजली दिवस नाही तर त्यांच्या विचारांना स्मरण्याचा दिवस आहे यांच्या बलिदानातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी असे सांगून अभिवादन केले.या वेळी शिक्षक व विद्यार्थ्यांनी दोन मिनीटे उभे राहून श्रध्दाजंली वाहून अभिवादन केले. या प्रसंगी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक बाळासाहेब तुपविहिरे विकास राऊत, प्रमिला बोडखे मॅडम, भाऊसाहेब बर्डे, विशाल जोशी, यशोदास वाघमारे, विकास व्यवहारे, गोरख लिंभोरे, देविदास आरगळे, व विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघमारे सरांनी केले व आभार बर्डे सरांनी व्यक्त केली

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २४ वर्षाच्या सेवेचा लाभ!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** राज्यातील अनुदानित खाजगी माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एससीपीएस सुनिश्चित करिअर प्रगती योजना अंतर्गत मिळणाऱ्या दुसऱ्या लाभा संदर्भातील राज्य शासनाचा १४ मार्च २०२४ रोजीचा शासन निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रद्द केला आहे. २४ वर्षाची सेवा पूर्ण केल्यानंतर मिळणारा दुसरा एससीपीएस लाभ केवळ एक जानेवारी २०२४ पासून लागू करणे हा मनमानी कारभार असून शासनाचा निर्णय भेदभाव पर्ण आहे. असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

राजकुमार चेनानी यांच्यासह ५६ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शासनाच्या या निर्णया विरोधात याचिका दाखल केली होती. या प्रकरणावर न्यायमूर्ती मुकुलीका जवलकर आणि न्यायमूर्ती नंदेश देशपांडे यांच्या समक्ष सुनावणी झाली. याचिकेनुसार राज्य शासनाने १४ मार्च २०२४ रोजी शासन निर्णय प्रसिद्ध केला होता. यामध्ये २४ वर्षांची सेवा पूर्ण केल्यानंतर मिळणारा दुसरा लाभ एक जानेवारी २०२४ पासून लागू करण्यात आला होता. हा लाभ त्यांच्या पात्रतेच्या प्रत्यक्ष तारखेपासून मिळायला हवा. असा कर्मचाऱ्यांचा दावा होता. यापूर्वीच्या निर्णयानुसार हा लाभ कर्मचाऱ्यांना त्यांच्या २४ वर्षाच्या सेवा पूर्ण झाल्याच्या तारखेपासूनच देण्यात यावा, असे न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच यापूर्वीही अशाच प्रकरणांत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना हा लाभ देण्याचे निर्देश देण्यात आले. त्यामुळे नवीन शासन निर्णयातील तारीख योग्य नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, न्यायालयाने १४ मार्च २०२४ चा शासन निर्णय सर्व पात्र कर्मचाऱ्यांना दुसरा लाभ त्यांच्या प्रत्यक्ष देय तारखेपासून देण्यात यावा, असे आदेश दिले. तसेच वेतन पुनरनिश्चिती, थकबाकी वेतन, निवृत्ती वेतन आणि इतर सर्व आर्थिक लाभ देण्याचे आदेश दिले. ही संपूर्ण प्रक्रिया सहा महिन्याच्या आत प्राप्त करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले असून प्रत्येक कर्मचाऱ्याने संबंधित पात्रता निकष पूर्ण करणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

न्यायालयाच्या या निर्णयाचे राज्य शिक्षकेतर महासंघाचे अध्यक्ष वाल्मीक सुरासे, राज्यसचिव पाराजी मोरे, समशेर पठाण, राजू पठाण, परशुराम वेताळ, नंदकुमार कुरुमकर, सतीश बडदे, कमलेश मुथा, सदाशिव काटेकर, सुनील म्हस्के, अशोक आळेकर, किशोर जामदार, तौसिफ शेख, भाऊसाहेब धनवटे आदींनी स्वागत केले आहे.



# श्रीगोंद्यात ब्रिज कामादरम्यान गंभीर अपघात

## खड्ड्यात पडून दुचाकीस्वार जखमी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा शहरातील सिद्धार्थनगर परिसरातील बाजार तळ येथे सुरू असलेल्या नॅशनल हायवेवरील ब्रिजच्या कामादरम्यान निष्काळजीपणामुळे गंभीर अपघात घडला आहे. पाऊलवाटेवरून जात असलेला एक दुचाकीस्वार थेट ब्रिजसाठी खणलेल्या खोल खड्ड्यात पडल्याने तो गंभीर जखमी झाला. घटनास्थळी ब्रिजचे काम सुरू असून रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पत्रे लावण्यात आले आहेत. मात्र, ज्या ठिकाणी हा अपघात घडला त्या बाजूने कोणतेही संरक्षणात्मक पत्रे किंवा रिफ्लेक्टर लावलेले नसल्याने हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. त्यामुळे संबंधित कॉन्ट्रॅक्टरच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

या संदर्भात कॉन्ट्रॅक्टरशी दूरध्वनीवर संपर्क साधला असता, स्थानिक नागरिकांच्या सोयीसाठी तात्पुरती पाऊलवाट तयार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, योग्य सुरक्षाव्यवस्था नसल्यामुळे ही पाऊलवाट धोकादायक ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, जवळील ससाणे नगरकडे जाणारा रस्ता देखील बंद करण्यात आल्याने पुणे व जामखेडकडून येणाऱ्या वाहनांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शहरात वाहतुकीची कोंडी वाढत असून नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणात वाहतूक पोलीस प्रशासन आणि संबंधित विभाग कोणती ठोस भूमिका घेतात, तसेच दोषींवर कारवाई होते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शेती, पशुपालन आणि पक्षी संगोपनाचा अनोखा मेळा! : आ.दाते

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** जिल्हा परिषद अहिल्यानगर व पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती पारनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय पशुपक्षी प्रदर्शन २०२६ हे आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडले. विविध प्रकारच्या पशुधनाचे आकर्षक प्रदर्शन, गुणवंत पशुपालकांचा सन्मान आणि बक्षीस वितरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.



यावेळी बोलताना आमदार दाते यांनी पशुपालकांच्या कष्टांचे कौतुक करत सांगितले की, तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून शेतकऱ्यांनी जीवापाड जपलेली जनावरे येथे आणली आहेत.

ही केवळ जनावरे नसून त्यांच्या कष्टाचे, जिव्हाळ्याचे आणि प्रेमाचे प्रतीक आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही शेतकरी जनावरांचे संगोपन करत आहे, हे कौतुकास्पद आहे.

मांजर, शेळी, कोंबडीपासून ते गाय, म्हैस, बैल आणि घोड्यांपर्यंत विविध पशुधन या प्रदर्शनात पाहायला मिळाले. काही पशुपालकांकडे आठ-दहा गायींचे गोठे आहेत, तर काहींनी उत्कृष्ट जातीचे बैल व जनावरे जोपासले आहेत.

पिंपळनेर येथील दिंडीच्या रथाची बैलजोडी तसेच इतर उत्कृष्ट पशुधन पाहून आनंद झाला. या प्रदर्शनामुळे पशुपालन क्षेत्राला नवी दिशा मिळेल.

प्रदर्शनाच्या आयोजनाबाबत समाधान व्यक्त करत त्यांनी सांगितले की, अशा प्रकारचे उपक्रम शेतकऱ्यांना प्रेरणा देणारे ठरतात. कमी जलस्रोतांमध्येही चाऱ्याचे नियोजन करून पशुधन टिकवणाऱ्या शेतकऱ्यांचे कार्य आदर्श आहे. शासनाच्या विविध योजनांमधून पशुपालकांना सातत्याने मदत मिळत असून या क्षेत्राला बळकटी देण्याचे काम सुरू आहे.

# तिलोक जैन विद्यालयाचा अभिनव उपक्रम गाजतोय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** शहरातील श्री तिलोक जैन विद्यालय हे नेहमीच उपक्रमशीलतेसाठी ओळखले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या या विद्यालयाने अलीकडेच एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत माजी विद्यार्थी संघ समितीची स्थापना केली आहे. या समितीच्या माध्यमातून 'ग्रंथालय समृद्धीकरण योजना' राबविण्यात येत असून, माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत ग्रंथालयासाठी पुस्तके भेट द्यावीत आणि वाचन संस्कृतीला चालना मिळावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमाला माजी विद्यार्थ्यांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

या आवाहनाला प्रतिसाद देत शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने विद्यालयाच्या ग्रंथालयाला सुमारे सत्तावीस हजार रुपये किमतीची तब्बल २२५ पुस्तके भेट देण्यात आली. या पुस्तकांमुळे ग्रंथालय अधिक समृद्ध होणार असून विद्यार्थ्यांना विविध विषयांवरील वाचनाची संधी उपलब्ध होणार आहे.




या प्रसंगी परिषदेचे संस्थापक सचिव सुनील गोसावी, अध्यक्ष राजेंद्र उदागे, राज्य संघटक डॉ. अशोक कानडे, उपाध्यक्ष डॉ. जी.पी. ढाकणे, राज्य कार्यवाह भारत गाडेकर, पाथर्डी तालुका अध्यक्ष अशोक दौंड, माजी विद्यार्थी समितीचे प्रसिद्धी प्रमुख व पत्रकार अनिल खाटेर,कमलेश मुथ्या, अजिनाथ शिरसाट तसेच ग्रंथपाल मच्छिंद्र बाचकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान डॉ. अशोक कानडे, डॉ. जी.पी. ढाकणे आणि अशोक दौंड यांनी आपले मनोगत व्यक्त करत विद्यालयाच्या उपक्रमाचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, तिलोक जैन विद्यालयाने सुरू केलेली ही ग्रंथालय समृद्धीकरण योजना अत्यंत अभिनव असून, यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यास मोठी मदत होईल. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागून ते ज्ञानाच्या दिशेने वाटचाल करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी उचललेले हे पाऊल अत्यंत स्तुत्य असल्याचे सर्व मान्यवरांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सुनील कटारिया यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राचार्य अजय भंडारी यांनी मानले. या उपक्रमामुळे विद्यालयात वाचन संस्कृती अधिक दृढ होण्यास निश्चितच हातभार लागणार असून, इतर शैक्षणिक संस्थांसाठीही हा एक प्रेरणादायी आदर्श ठरणार आहे.

# शिक्षक समाजाचे खरे शिल्पकार : आ.काशिनाथ दाते

## अ.नगर डिस्ट्रिक्ट से.टीचर्स को-ऑप.सो.च्या वतीने सेवानिवृत्त कृतज्ञता सोहळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** सोमवार दि. २३ मार्च २०२६ अ.नगर डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी, शाखा पारनेर यांच्या वतीने आयोजित कृतज्ञता सोहळा, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शहीद जवान मदत निधी उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी जी.एस. महानगर को-ऑपरेटर्स बँकेच्या अध्यक्षा गितांजलीताई शेळके, अ.जि.म. वि. प्र.स. डॉ. भाऊसाहेब खिलारी, चेअरमन आप्पासाहेब शिंदे, एस.डी. आंधळे, व्हा. चेअरमन अर्जुनराव वाकळे, संचालक



महेंद्र हिंगे,वर्षा खिलारी, वैशाली दारकुंडे, विजय पठारे, उमेश गुंजाळ, सुधीर कानवडे, किशोर धुमाळ, आप्पासाहेब जगताप, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे इ. मान्यवर व संस्थेचे सभासद, पाल्य व स्थानिक नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार दाते सरांनी माध्यमिक शिक्षकांच्या कार्याचे मनापासून कौतुक करताना सांगितले की, माध्यमिक शिक्षक हे समाजाचा कणा असून ते केवळ ज्ञान देत नाहीत, तर विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, टीकात्मक विचार आणि सामाजिक जबाबदारी रुजवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. किशोरवयीन अवस्थेत असलेल्या विद्यार्थ्यांना योग्य-अयोग्य याची जाणीव करून देत त्यांना सुसंस्कृत व जबाबदार नागरिक बनवण्यामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत मोलाची आहे.

ते पुढे म्हणाले की, शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा, शिस्त, सहकार्य आणि समानतेची भावना निर्माण करतात. विविध पार्श्वभूमीतून आलेल्या विद्यार्थ्यांना एकत्र आणून सामाजिक एकतेचा संदेश देण्याचे काम शिक्षक करत असतात. केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार करण्याची क्षमता, समस्या सोडवण्याची कौशल्ये आणि भविष्यातील योग्य निर्णय घेण्याची ताकद देण्याचे कामही शिक्षक करत असतात. त्यामुळे शिक्षक हे राष्ट्रनिर्माते असून त्यांच्या हातूनच देशाचा सक्षम नागरिक घडतो.

शासनाच्या सोयीसुविधांबाबत व्यक्त झालेल्या नाराजीवर आमदार दाते सर म्हणाले की, शासन विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करत आहे. शिक्षण, पायाभूत सुविधा, आरोग्य, शेतकरी कल्याण यांसाठी अनेक योजना राबवल्या जात आहेत. अलीकडेच अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला असून त्याला मदत करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अशा आपत्तींचाही आर्थिक भार सांभाळत शासनाला विविध क्षेत्रांचा समतोल राखावा लागतो.

तसेच त्यांनी नमूद केले की, मतदारसंघातील प्रत्येक लहान-मोठ्या प्रश्नांकडे मी बारकाईने लक्ष देत असून विधानभवनातील माझी उपस्थितीही शंभर टक्के आहे. शिक्षकांच्या अडचणींबाबत मला पूर्ण जाणीव आहे आणि योग्य वेळी त्यावर निश्चितपणे उपाययोजना करण्यात येईल.

कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध मान्यवरांच्या वतीने समाजातील शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि शहीद जवान मदत निधी उपक्रमामुळे कार्यक्रमाला सामाजिक बांधिलकीची जोड मिळाली. या सोहळ्यामुळे शिक्षक, विद्यार्थी व समाज यांच्यातील नातेसंबंध अधिक दृढ होत असून शिक्षक हेच समाजाचे खरे शिल्पकार हा संदेश अधोरेखित झाला.

दैनिक राष्ट्र सह्याद्री



## चुकीची माहिती देणाऱ्यावर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : डायल ११२ या क्रमांकावर चुकीची माहिती देऊन आपत्कालीन डायल प्रणालीचा दुरुपयोग करणाऱ्या एकावर वैजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किशोर मोगल जगताप (रा. स्वामी समर्थ नगर) असे आरोपीचे नाव आहे. या प्रकरणात पोलिस अंमलदार शुभम रावते यांनी फिर्याद दाखल केली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार किशोर जगताप याने डायल ११२ या क्रमांकावर कॉल करून पोलिसांना रविवारी (२२ मार्च) दुपारी दोन वाजेला बोरसर कारखाना येथे दारू व पेट्रोलची विक्री होत आहे अशी खोटी माहिती दिली. आपत्कालीन डायल ११२ वर खोटी माहिती दिल्याप्रकरणी किशोर मोगल जगताप याच्या विरोधात वैजापूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलिस हवालदार पडळकर हे करतआहेत.

# ‘लुटेरी दुल्हन’ला ठोकल्या बेड्या

## खोटे लग्न करून फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : कोपरगाव तालुक्यातील रवंदा येथील युवकाचे लग्न झाले आणि दोनच दिवसात नवीन नवरी पसार झाली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येतात नवऱ्या मुलाने थेट कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी लग्नाचे खोटे अमीष दाखवुन लाखो रुपयांची, सोने व चांदीची आर्थिक फसवणुक करणारी टोळीचा पर्दाफाश करत, पोलिसांनी एका महिलेसह दोन तरुणींना जेरबंद केले आहे तर तीन आरोपी फरार झाले आहे.



कोपरगाव तालुका पोलीस फरार आरोपींचा शोध घेत आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २१ सप्टेंबर २०२५ ते दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान रवंदे गावातील फिर्यादी यांची कशीष सुकदेव भालेराव, न्रमता सुकदेव भालेराव, भुमी किरण निकम सर्व रा. जत्रा चौक, आडगाव नाका ता जि.नाशिक, अशोक तान्हाजी काळे, वनिता अशोक काळे दोन्ही रा आंगणगाव ता. येवला,तसेच गोकुळ चिंदा पानकर रा. मदरतेरेसा चौका जवळ, नाशिक अशांनी संगणमत करुन लग्नाचे अमिष दाखवुन २ लाख २९ हजार रु. रोख रक्कम, सोने व चांदीचे दागिने घेऊन फसवणूक केल्याचे फिर्यादीवरुन कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन येथे १८ फेब्रुवारी २०२६ रोजी गुरनं ६०/२०२६ बी एन एस कलम ३१८(४), ३१६(२),३(५) प्रमाणे दाखल केला होता. सदर गुन्हयाचा तपास चालु होता.

सदर गुन्हयाचा तपास वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करीत असताना, आरोपी क्रमांक १ ते ३ यांचा आडगाव नाका,जि.नाशिक येथे तपास केला असता, त्यांना शिताफिने ताब्यात घेतले होते. आरोपींना मा. न्यायालयात हजर करुन त्यांची पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली होती. सदर आरोपींना पोलीस कोठडी दरम्यान गुन्हयांचे अनुषंगाने विचारपुस केली असता, आरोपींनी संगनमताने खोटे लग्न लावुन फसवणुक केली असल्याची माहिती दिली होती, आरोपीने गुन्हयातील फसवणुक करुन अपहार केलेले रोख रुपये, सोने व चांदीचे दागिने काढुन दिले असुन, जप्त करण्यात आले आहेत.

कोपरगाव तालुका पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, पोलीस उपाधीक्षक अमोल भारती यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदिप कोळी, पोना. आर.ओ.कारखेले, मपोकॉ.ज्योती रहाणे,पोहेक. अनिता वलवे, पोकॉ. जयदिप गवारे, पोकॉ.अंबादास वाघ तसेच मा.अपर पोलीस अधीक्षक कार्यालय, श्रीरामपुर (मोबाईल सेल) येथील पोहेकॉ.संतोष दरेकर, सचिन धनाड, राम वेताळ यांनी केलेली आहे.

## किरकोळ कारणावरून एकास बेदम मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील अशोकनगर फाटा परिसरात किरकोळ कारणावरून तिघांनी मिळून एकास बेदम मारहाण करून जखमी केले. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील अशोकनगर फाटा, राऊत वस्ती येथील अनिल मोतीराम चौगुले हे दि. २० मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे ८.१५ वाजण्याच्या सुमारास ते त्यांच्या मोटरसायकलवरून अशोकनगर फाटा चौकातून जात होते. त्यावेळी सागर जगन्नाथ गंगावणे, ज्ञानेश्वर अण्णासाहेब गांगुर्डे व आदित्य छबू वायकर (सर्व रा. वडाळा महादेव, ता. श्रीरामपूर) यांनी त्यांना अडवून किरकोळ कारणावरून वाद घातला.


सदर वादाचे कारण असे की, यापूर्वी सागर गंगावणे याने अनिल चौगुले यांना कट का मारला या कारणावरून जाब विचारला होता. त्यावेळी चौगुले यांनी त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यावरूनच आरोपींनी राग धरून पुन्हा चौगुले यांना अडवून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी तसेच लाकडी दांडक्याने मारहाण केली. या मारहाणीत चौगुले यांच्या हात, पाय व छातीवर मार लागून ते जखमी झाले. ही घटना पाहून लोकांची गर्दी होत असल्याचे पाहून मारेकरी घटनास्थळावरून पळून गेले. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात अनिल मोतीराम चौगुले यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसानी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## हरेगाव ब्राह्मणगाव फाटा येथे बिबट्याचे दर्शन..

### पिंजरा लावण्याकडे सतत दुर्लक्ष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव तसेच शिरसगाव ब्राह्मणगाव परिसरात सतत अनेकांना बिबट्या दिसत असतो अनेक वेळा मागणी करूनही वन खात्याकडून पिंजरा लावल्या जात नाही एखादी दुर्घटना घडल्यावर वन खात्याला व लोकप्रतिनिधीला



जाग येईल अशी परिसरातील नागरिकांना सतत शंका येते.रविवार दिनांक २२ मार्च रोजी सायंकाळी आठ वाजता हरेगाव ब्राह्मणगाव फाटा रूपानगर एक नंबर बंगल्याच्या परिसरात बिबट्याचे दर्शन घडले श्रीरामपूर कडून येताना जोत्सना पंडित यांनी प्रत्यक्षात आपल्या कार मधून जात असताना समोर बिबट्या दिसला व त्याचे लगेच फोर व्हीलर वाहन असल्याने लगेच त्याचे व्हिडिओ चित्रण मोबाईलमध्ये काढले त्याचप्रमाणे परिसरातील काही नागरिकांनी मोटरसायकलवर येताना त्याठिकाणी बिबट्याला पाहिल्याचे सांगितले. श्रीरामपूरला जाताना व येताना नागरिक शेतकरी यांच्यामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे म्हणून या बिबट्याला तातडीने जेरबंद करण्यासाठी व दुर्घटना होण्याअगोदर वनखात्याने पिंजरा लावण्याची मागणी हरेगाव ब्राम्हणगाव येथील माजी सरपंच दिलीप त्रिभुवन ,दीपक नवगिरे ,माझी ग्रा.प सदस्य सुनील शिनगारे अशोक बोधक ,भाऊसाहेब व्हसाळे , सुभाष पंडित,राजेंद्र मगर आदी नागरिकांनी केली व या घटनेची गंभीर दखल घेऊन तातडीने पिंजरा लावावा अशी मागणी केली.

## केरोसीन वापरणाऱ्या नागरिकांचा प्रशासनाकडून सर्वे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील नागरिकांना केरोसीन पुरवठा करण्याबाबत प्रशासन विचार करत असून यासाठी प्राथमिक स्तरावर सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. गॅसऐवजी केरोसीन वापरण्यास किती कुटुंबे इच्छुक आहेत, याचा अंदाज घेण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यासंदर्भात स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून गावोगावी सोशल मीडिया ग्रुपवर रेशन कार्डधारकांना एक फॉर्म पाठविण्यात आला आहे. या फॉर्ममध्ये केरोसीन वापरासाठी आवश्यक असलेल्या स्टोव्हची उपलब्धता, तसेच नागरिकांची तयारी याबाबत माहिती विचारण्यात येत आहे. तसेच गावातील भांडी विक्रेत्यांकडूनही स्टोव्हची उपलब्धता आणि मागणी याची माहिती प्रशासनाने घेतली आहे. या सर्वेक्षणातून रेशन कार्डधारकांपैकी किती जण केरोसीनचा पर्याय स्वीकारण्यास तयार आहेत, याचे चित्र स्पष्ट होणार आहे. प्राप्त माहितीनुसार, संभाव्य आपत्कालीन किंवा युद्धजन्य परिस्थितीचा विचार करून हा सर्वे घेतला जात आहे. गॅसच्या ऐवजी केरोसीनचा वापर करण्याची तयारी नागरिकांकडे आहे का, याचा अंदाज घेणे प्रशासनासाठी महत्त्वाचे ठरत आहे. दरम्यान, सर्वेक्षणानंतरच तालुका व जिल्हास्तरावर केरोसीन पुरवठ्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती प्रशासनाच्या सूत्रांकडून मिळाली आहे.

## लोखंडी कत्ती जवळ बाळगून दहशत माजवणारा तरुण ताब्यात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : लोखंडी कत्ती जवळ बाळगून दहशत करणाऱ्या आरोपी तरुणाला राहुरी पोलिस पथकाने दि. १८ मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास राहुरी कॉलेज परिसरात मोठ्या शिताफिने ताब्यात घेऊन गजाआड केले.

तसेच त्याच्याकडून कत्ती जप्त करण्यात आली.राहुरी येथील पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना गुप्त खबऱ्या मार्फत मिळालेल्या माहितीनुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सुरज गायकवाड, प्रमोद ढाकणे, अंकुश भोसले, सतीष कुऱ्हाडे आदि पोलिस पथकाने दि. १८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजे दरम्यान शहर हद्दीतील राहुरी कॉलेज परिसरात छापा टाकला.

त्यावेळी एक तरुण लोखंडी कत्ती हातात घेऊन इमारतीच्या पायरीवर बसून दहशत करत असलेला दिसला. त्यावेळी पथकाने झडप घालून त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून लोखंडी कत्ती जप्त केली. पोलिस हवालदार अंकुश बाबासाहेब भोसले यांच्या फिर्यादीवरून आरोपी आकाश अशोक काळे, (वय २२ वर्ष रा. दत्त वसाहत, राहुरी) याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला गजाआड केले. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## ग्रामपंचायत सदस्यावर जीवघेणा हल्ला

### सरपंच पतीसह सहा जणांवर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील भैरवनाथनगर ग्रामपंचायतीचे सदस्याला श्रीरामपूर-बेलापूर रोडवरील सद्गुरु मंगल कार्यालय येथे लोखंडी गजाने आणि फायटरने हल्ला करत भरदिवसा प्राणघातक हल्ला करण्यात आला. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात सरपंचपतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील भैरवनाथनगर येथे राजकीय वादातून भैरवनाथनगर ग्रामपंचायतीचे सदस्य वसंत पाराजी देवकर (वय ५०) हे १६ मार्च २०२६ रोजी दुपारी २:३० वाजता एका विवाह सोहळ्यासाठी गेले होते.

लग्नाचे जेवण उरकून ते हात धुण्यासाठी बाजूला गेले असता, तेथे अक्षय विजय फरगडे, अभिजीत जालींदर शिंदे, गणेश तांबे, बबल्या उर्फ अजय फरगडे आणि संकेत विजय फरगडे यांनी त्यांना गाठले. यावेळी अक्षय फरगडे याने देवकर यांना विचारले की, तू माझे चुलते प्रविण बाबुराव फरगडे आणि दिलीप फरगडे यांच्या ग्रामपंचायत कामकाजात का अडथळा आणतोस? मला प्रविण फरगडेने तुझा कार्यक्रम करण्यासाठीच पाठवले आहे. असे म्हणून त्याने हातातील लोखंडी गजाने देवकर यांच्या कपाळावर जोरदार प्रहार करून त्यांना गंभीर जखमी केले. या हल्ल्यावेळी इतर काही जणांनी वसंत देवकर यांना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली.

संकेत फरगडे याने त्याच्या हातातील फायटरने देवकर यांच्या पाठीवर वार केले, तर इतर आरोपींनी त्यांना लाथाबुक्क्यांनी तुडवले. मारहाण सुरू असतानाच जर पुन्हा आमच्या चुलत्यांच्या नादी लागला, तर तुझा 'संतोष देशमुख' करून टाकू अशी जीवे मारण्याची उघड धमकी आरोपींनी दिली. लग्नातील उपस्थित लोकांनी मध्यस्थी केल्यानंतर आरोपी तेथून पसार झाले. त्यानंतर गावातील गोविंद कांदे यांनी जखमी अवस्थेत असलेल्या देवकर यांना उपचारासाठी तात्काळ साखर कामगार हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात वसंत देवकर यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी सरपंच पती प्रविण बाबुराव फरगडे याच्यासह अक्षय विजय फरगडे, अभिजीत जालींदर शिंदे, गणेश तांबे, बबल्या उर्फ अजय फरगडे, संकेत विजय फरगडे आणि मुख्य सूत्रधार प्रविण बाबुराव फरगडे यांच्यासह अन्य २ ते ३ अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## वरिष्ठांशी चर्चा करूनच निवडणूक लढणार : प्राजक्त तनपुरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : निवडणूक लढविण्याचा निर्णय वरिष्ठांशी चर्चा करून घेवू मागच्या निवडणूकीत महविकास आघाडीच्या उमेदवारांचा पराभव हा लाडकी बहीण योजनेचा अपप्रचार केल्याने झाला . २५ ते ३० टक्के लाडक्या बहिणीचे पैसे सरकारने बंद केले . तालुक्यातील सत्तावीस हजार लाडक्या बहिणींचे पैसे बंद झाल्याचा आरोप माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी तालुक्यातील म्हैसगाव येथे जनआशिर्वाद यात्रेत बोलताना केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबासाहेब हुलुळे हे होते तर व्यासपिठावर मच्छींद्र सोनवणे, किसन जवरे, बापूसाहेब गाढे, भारत भुजाडी, दत्ता कवाणे, ज्ञानेश्वर बाचकर, बापूसाहेब गागरे हे उपस्थीत होते.

राहुरी पाथर्डी नगर मतदार संघाच्या पोटनिवडणुकीच्या अनुशंगाने माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी जनतेशी संवाद साधण्यासाठी काढलेल्या जन अशिर्वाद यात्रेच्या दुसऱ्या दिवशी दरडगाव थडी, शेरी



चिखलठाण, म्हैसगाव व कोळेवाडी या गावांना भेटी देत जनतेशी संवाद साधला. पुढे बोलताना तनपुरे म्हणाले की शासनाने शेतकऱ्यांना फायद्याची ठरणारी एक रुपयाची पिक विमा योजना बंद केली . याच बरोबर निवडणूकीच्या तोंडावर सुरु केलेल्या अनेक योजना सरकारने बंद केल्या . सामाजिक न्याय व आदिवासी विकास मंत्रालया चा निधी इतर योजना मध्ये वळवला. सत्तेत असताना मतदार संघाच्या विकास कामांसाठी कधी कमी पडलो नाही.

विरोधी पक्षात गेल्यावर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर, पिक विमा भरपाई, विजेच्या प्रश्नांवर, विद्यार्थ्यांसाठी, बिबट्याच्या मानवावर आलेल्या संकटावर विधान सभेत आवाज उठवला. यापुढे कोणत्याही सरकारी प्रकल्पासाठी मतदार संघातील जमीन जावू देणार नाही . अशी ग्वाही त्यांनी दिली . यावेळी चांगदेव चोपडे, रामदास बाचकर, आणि आबासाहेब काळनर यांनी मनोगत व्यक्त केले. या जनसंवांद यात्रेत जनतेने भरभरून प्रतिसाद दिला .

## ‘दादा’चा वादा राहुरीत डांबरीकरण पूर्ण

### यात्रेआधीच वाहतुकीला दिलासा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : नगर-मनमाड महामार्गाच्या कामामुळे गेल्या काही दिवसांत राहुरी शहरात वाहतूक कोंडी, धूळ आणि दैनंदिन गैरसोयी वाढल्या होत्या. त्यातच ग्रामदैवत खंडोबा महाराजांच्या यात्रोत्सवाची तयारी सुरू असताना रस्त्याची अपूर्ण अवस्था नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरली होती. मात्र यात्रेपूर्वीच शहरालगतचा डांबरीकरणाचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाल्यामुळे नागरिकांनी डॉ सुजय विखे यांचे आभार मानले आहेत.





राहुरीचे ग्रामदैवत खंडोबा यात्रेला दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहतात. अपूर्ण रस्त्यामुळे होणारी गैरसोय टाळण्यासाठी स्थानिकांकडून रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणांनी कामाचा वेग वाढवला. भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी काही दिवसांपूर्वी सकाळी राहुरीत येऊन कामाची पाहणी केली होती.

यावेळी त्यांनी ठेकेदार व अधिकाऱ्यांना यात्रेपूर्वी काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर कामाला गती आल्याचे स्थानिकांनी सांगितले. शहरातील मुख्य मार्गावरील डांबरीकरण पूर्ण झाल्याने वाहतूक कोंडीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. यामुळे स्थानिक नागरिकांसह यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांनाही सोयीचे झाले आहे. रस्त्याचे काम वेळेत पूर्ण झाल्याबद्दल नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. यात्रेपूर्वी रस्ता पूर्ण झाल्याने मोठी अडचण टळली, अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी दिली. तसेच, अनेक वर्षांपासून रखडलेल्या या प्रकल्पाला आता गती मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले. नगर-मनमाड महामार्गाच्या उर्वरित कामांकडेही प्रशासनाने लक्ष देण्याची गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे.

सुरू असलेली कामे नियोजित वेळेत पूर्ण झाल्यास परिसरातील वाहतूक आणि पायाभूत सुविधा अधिक सुधारतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## श्री शेत्र शनिशिंगणापूर जागतिक तीर्थक्षेत्र : गुरुवर्य भास्करगिरी महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : श्री शनेश्वर महाराजांनी शनिशिंगणापूर भूमीत अवतार धारण केल्याने दिवसेंदिवस जगभरातून लाखो भाविक दर्शनासाठी येत असल्याने हे देवस्थान जगाच्या नकाशावर गेले असून जागतिक तीर्थक्षेत्रामध्ये नोंद झाली, असल्याचे मत श्री शेत्र देवगड देवस्थानचे प्रमुख ह भ प गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांनी व्यक्त केले हभप भास्करगिरी महाराज यांनी शनेश्वर देवस्थान व ग्रामस्थांच्या वतीने शिंगणापूर येथे सुरू असलेल्या महंत उदासी महाराज यांच्या ७० व्या पुण्यतिथी निमित्ताने कार्यक्रमांस आले असता त्यानिमित्त ते बोलत होते. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने महाराजांचा सन्मान माजी कोषाध्यक्ष पंढरीनाथ शेटे, हभप कारभारी महाराज पंडित व हभप आदिनाथ महाराज भोगे यांनी केला. महाराज पुढे म्हणाले की, महंत उदासी महाराज व वै.बाबुराव बानकर यांनी त्याग करून करोडो भाविकांचा आत्मविश्वास संपादित केला, म्हणून छोटे असलेले देवस्थान वटवृक्षाप्रमाणे जागतिक क्षेत्रामध्ये प्रसिद्ध झाले हे देवस्थान आपले



समजून गावकऱ्यांनी प्रथा -परंपरा अवगत करून हिंदू संस्कृतीचे रक्षण करावे व वारकरी संप्रदायाचा प्रचार प्रसार व साधुसंताचे विचार हेच सुखी जीवनात समाधान आणू शकते.असे त्यांनी विचार दिले.स्वर्गीय बानकर भाऊ यांनी प्रपंच करून साधुसंतांची व शनि देवाची मनोभावे सेवा केल्याने देवाने त्यांना जवळ घेऊन पायापाशी जागा दिली, हे कलियुगामध्ये जिवंत उदाहरण आहे. यावेळी रावसाहेब शेटे, पोलीस पाटील ॲड.सयाराम बानकर, माजी सरपंच बाळासाहेब बानकर, बापू तात्या शेटे,माजी अध्यक्ष बाळासाहेब बोरुडे, डॉक्टर रावसाहेब पाटील बानकर, भगवंतराव दरंदले,ह.भ.प. घायाळ महाराज यांच्यासह महिला, पुरुष, वाचक, देवस्थानचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.